मार्च १९८८ किंमत २ रु.

श्री

# साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक



मार्च १९८८

# श्री साईलीला

श्री साईबाबा संस्थान
शिरडीचे अधिकृत मासिक

संपादक

**श्री. रा. द. बन्ने**

कार्यकारी अधिकारी श्रीसाईबाबा संस्थान शिरडी

-: कार्यकारी संपादक :-

**श्री. सदानंद चेंदवणकर**

(मराठी आवृत्ती)

६६ वे) (अंक १२ वा

किंमत २ रुपये

दूरध्वनीः- ४१२ २५ ६१

- कार्यालय -

ईनिकेतन'', प्लॉट नं. ८०४ बी. डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई- ४०० ०१४.
वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख. सह) किरकोळ अंक २ रु. फक्त.

**श्री साईबाबांच्या संदेशाचा जगभर प्रसार करणे हे**
**श्री साईलीलाचे मुख्य उद्दिष्ट आहे.**



# रघुनाथ सावित्री साईनाथ भजनमाला

४३

जेविता मिष्टान्नें जिवा होय हानी ।
साध्या भोजनांनी मिळे सुख ॥
वरण भात भाजी सत्वशील अन्न ।
करिती सेवन बहूजन ॥
साध्या सोप्या शब्दें आठवावा हरी ।
नित्य नित्य बरी हीच सेवा ॥
स्वरुप गुरुचें किति साधें भोळें ।
दासा या न मिळे आन थोर ॥
ऐकिलें ऐकावें पुन्हां पुन्हां गावें ।
भावे ते वंदावे श्रीचे पाय ॥
सद्‌गुरु चालक सद्‌गुरु पालक ।
जननी जनक तोचि खरा ॥
श्रवण मनन करावें चिंतन ।
सुख समाधान मिळे यांत ॥
सद्‌गुरु सदया देइं तूं दासाला ।
नाम कीर्तनाला प्रेमबळ ॥

४४

उद्योगाचे घरीं लक्ष्मी वास करी
आळशासी वरी अक्काबाई ॥
भावाविण गुरु गुरुवीण देव ।
मानवा जाणीव कुठली ती ॥
भक्ति युक्ति मुक्ति शांति समाधा
चंचल हें मन टिकों नेदी ॥
दास ह्मणे बोला राम कृष्ण हरी
मुकुंद मुरारी परब्रह्म ॥

या मासिकात प्रकाशित झालेल्या लेखांतील मतांशी संपादक सहमत आहेतच असे नाही.


# श्री साईलीला – मार्च १९८८

## अनुक्रमणिका


| मांक | लेख-कविता शिर्षक | लेखक-कवी नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | संपादकीय | – | ४ |
| | गुढीपाडवा व त्याचे महत्व | – | ७ |
| | मी पाहिलेले साईबाबा | – श्री. ग. ज. चितांबर | ८ |
| | सर्वांना रमविणारा राम | – श्री. म. वा. करंबेळकर | १७ |
| | साईदरबारातील माणिक आणि मोती – ५ | – सौ. सरोजिनी मुळये | १९ |
| | श्री बाबांचा एक अनुभव | – सौ. स्नेहलता स्वादीया | २१ |
| | तुमचे श्री साईविषयक सामान्य ज्ञान किती | – सदानंद चेंदवणकर | २२ |
| | इंदूरचे श्री. माधवनाथ महाराज | – श्री साईनंद | २३ |
| | श्रीरामचरितमानस | – सौ. कुसुमताई जोग | २७ |
| | श्रीसद्‌गुरु किसनगिरी बाबा व देवगड | – श्री साईनंद | ३२ |
| | श्री साईबाबांचा अनुग्रह | – शालिनी देसाई | ३५ |
| | खापर्डे यांची शिरडी दैनंदिनी | – साईनंद | ३८ |
| | बाबा माझे कृपाळू | – सौ. श्रद्धाकेणी | ३९ |
| | श्री साईस्मरण चिंतनातून चिदाकाशाकडे | – श्री. चकोर आजगांवकर | ४० |
| | साध्यापेक्षा साधनेला अधिक महत्व दिले पाहिजे | – डॉ. श्रीपाद परुळेकर | ४१ |
| | श्रीबाबांचे अतर्क्य दळण | – श्री. रमेश चव्हाण | ४३ |
| | परोपकारी साईबाबा | – श्री. दत्ताराम घुगे | ४५ |
| | श्रीसाईसहस्र नामावली | – श्री. संजीव चंदने | ४७ |
| | चराचरी भरेसांई | – श्री बी. व्ही. लांजेकर | ५० |
| | इति श्री साई उवाच | – श्री. डी. जी. देशपांडे | ५१ |
| | दार उघड साई | – सौ. नीता जाधव | ५७ |
| | साई माझे आई | – कु. सुरेखा होबळे | ५८ |
| | साई राजा | – श्री. मुरलीधर घोलप | ५८ |
| | शिरडी वृत्त | – ऑक्टोबर ८७ | ५९ |
| | घोषणा | – | ६४ |

# श्रीसाईबाबा आणि सर्वधर्मसमभाव

## संपादकीय



अवतारी पुरुष किंवा पूर्णत्वा पोचलेले संत महात्मे यांच्या मन किंचितही भोगवासना नसल्यामुळे त्यां लोह आणि सुवर्ण, मंगल आणि अमंगल सोवळे-ओवळे, ब्राह्मण आणि अंत्यज स काही सारखेच असते. श्रीसंत चूडामण साईबाबांनी आपल्या अवतारकार्या सुरुवात केली, त्यावेळी जात, धर्म, पंथ कृत्रिम उच्चनीचतेची परंपरा या मान निर्मित बाबींना कधीच महत्व त्यांनी दि नाही. सर्व मानवांकडे ते समभावने सर्वधर्मसमभावनेने पाहात असत. शरी पोषणासाठी ते कुणाच्याही हातचे अन्नपाणी घेत. कारण जातीभेदाची प्रथा, भावन त्यांना मूळातच मान्य नव्हती. त्यामुळे त्यांना कर्मठ व रुढी चुस्त ब्राह्मण याच्याकडू खूप त्रास सहन करावा लागला. यातून सुटका करुन घेण्यासाठी, ते द्वारकामाईत उर्फ मशिदमाइत राहात असत.

श्री संत साईबाबा हे पूर्णत्वाला पोचलेले योगी महात्मा होते. ते परमहंस वृत्तीचे पूर्ण अधिकारी आहेत, हे त्यावेळच्या समाजाला त्यांचे अनेक चमत्कार दिसून आल्याव पटू लागले. त्यांच्या शब्दावर अनेक लोक विश्वास ठेवू लागले ते नंतरच.

महाराष्ट्रातील संतांनी भागवत धर्माची स्थापना केली. समभाव वाढीस त्यांनीच लावला. मानवतेचे महत्व समाजास पटविले. धार्मिक बाबतीत कृत्रिम उच्चनीच भेद आडवा येऊ शकत नाही. परमेश्वर प्रार्थनेचा व प्राप्तीचा अधिकार कोणत्याह जातीच्या व पंथाच्या स्त्री पुरुषास समान आहे, हे तत्व श्री साईनाथांनी समाजाच्य हितासाठी त्याकाळी उघडे केले.

श्रीसाईंच्या प्रसिध्दी काळात एक मुंबईकडील गृहस्थ दर्शनास आले. त्यांनी भक्तीभावाने श्रीसाईचरणी मस्तक ठेवले. बाबांनी त्यांच्या कपाळावर हात ठेवून उदी लावली. यामुळे त्या गृहस्थास अत्यानंद झाला. मशिदीमध्ये बसलेल्या मंडळींमध्ये त्यांच्या संबंधी चर्चा सुरु झाली. कारण तो जातीने चांभार होता. त्या गृहस्थाची पाचावर धारण बसली. हे अंतर्ज्ञानी बाबांनी ओळखले. काही मंडळी म्हणू लागली, हे महापाप आहे. काही मंडळींनी श्रींकडे तक्रार केली. बाबांनी त्या गृहस्थास परत बोलावले व जवळ बसविले. तिथे जमलेल्या भक्तांना उद्देशून श्रीबाबा बोलू लागले, देवाच्या दरबारात भेदाभेद मानणे, हेच महापाप आहे. परमेश्वराचे नाव घेण्यास व त्याच्या मंदिरात जाण्याचा प्रत्येक मनुष्यास हक्क आहे. आपण सर्वच त्याची लेकरे

आहोत. माणसाने धर्माच्या बाबतीत भेदभाव ठेऊन वागावे, हे देवास कधीही मान्य होणार नाही, या विषयावर बाबा चांगले तासभर बोलत होते. समाजात समभाव निर्माण करण्यासाठी श्रीबाबा अधिकार वाणीने उपदेश करीत. कै. नानासाहेब चांदोरकर, दिक्षित, शामा, बुट्टी इ. मंडळी लक्ष देऊन हे ऐकत होती. इतक्यात म्हाळसापतींनी त्येच एकनाथांचा अभंग म्हणून दाखविला —

जो जातीने नीचत्वास गेला। भक्तीभावे उंचावला।
तो मद्रुप पावला। पूज्य झाला तिन्ही लोकी॥

प्रभू श्री रामचंद्राने शबरीची उष्टी बोरे खाल्ली. श्रीरामाने तिची जात न बघता त्या या पाठीमागच्या भावना ओळखल्या. त्यामागची तिची भक्ती पाहिली. अंतःकरणापासून केलेली भक्ती देवापर्यंत पोचतेच पोचते.

संत एकनाथ महाराज ब्राह्मण असून ते महाराच्या घरी जेवले. त्यांना सर्वांच्या अंतर्यामी देव दिसत असे. त्यांनी कधीही हा नीच, तो उच्च, असा जातीचा भेदभाव केला नाही. गीतेत १८व्या अध्यायात श्रीकृष्णाने सांगितले आहे की,

इश्वरः सर्वभूतानां हृदयो S र्जुन तिष्ठति।
भ्रामयन्सर्व भूतानि यन्त्रारूढानि मात्रया।

प्राणीमात्रांच्या हृदयात परमेश्वराचे अस्तित्व आहे. तो यंत्रावर घातल्या प्रमाणे त्यांने मोहाने मिरवीत असतो.

मानवाने जातीभेद मानू नयेत, म्हणून सर्व जातींमध्ये देवाने संतरुपाने जन्म घेतला आहे. संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, हे ब्राह्मण होते. गोरा कुंभार, सावतामाळी, नामदेव शिंपी, तुकाराम बुवा वाणी, जनाबाई, चोखा महार, नरहरी सोनार, रोहिदास चांभार या संतांच्या अंगी किती नम्रता, मानवता होती. ते कुणाचेही मन दुखवत नसत. कुणालाही हड हड करीत नसत. सर्वांशी प्रेमाने वागत. मोठ्यांचा मान ठेवीत. अशा संतांच्या ठिकाणीच देवाचे वास्तव्य असते.

श्री साईनाथांना सुरुवातीला किती कठीण प्रसंगाला तोंड द्यावे लागले. त्यांना उच्च वर्णीय लोक भिक्षाही धड देत नसत. जे मिळेल त्यात पक्षी, कुत्री, मांजरांचे वाटे तसेच अगदी गरीब लोकांचेही वाटे असायचे. त्यातून जे राहील त्यात श्री बाबा चार घास कसेबसे खात असत. पण पुढे श्री बाबांचे महत्व सर्व लोकांना पटले. तेव्हा त्याच्या पुढे पंच पक्वानांची ताटेच्या ताटे येऊ लागली. ती सारी ताटे एकत्र करुन श्रीबाबा त्याचा प्रसाद म्हणून सर्वांना एकाच पंक्तीत बसवून वाटत असत. त्यांच्याकडे नैवेद्याची ताटे सर्व जातीतील लोकांकडून येत असत. कधीकधी हा प्रसाद बडे बाबा या मुसलमान फकीराच्या हातून वाढीत असत. त्यावेळी बाबा विचारीत, "बडे बाबांच्या हातून वाढलेले अन्न आता तुम्ही कसे काय खाता?" तेव्हा काही भक्त म्हणत, "हे बाबांचे स्थान आहे. येथे स्पृशा-स्पृश्य हा भेदभाव नाही."

त्यावर बाबा म्हणत, "सर्व जगच जर ईश्वराचे आहे, तर त्यात तिथे वागताना माणसाने भेदाभेद मानू नये. सर्व प्राणीमात्रात माणसालाच जास्त बुध्दी

समजूतदारपणा, विचार, विवेक परमेश्वराने दिला आहे. म्हणून तो ईश्वर ठेवील
राहावे, त्यात समाधान मानावे. कर्म सतत करीत राहावे. पण फळाची आशा क
धरु नये. चांगल्या कर्माची फळेही चांगलीच मिळतात. वाईट कर्म केले तर ते भो
लागणार, हे प्रत्येक माणसाने कधीही विसरु नये.

हजारो व्याख्याने, प्रवचने देऊन अगर ग्रंथ वाचून जे होणार नाही, साधणार
ते श्री साईबाबांनी त्याकाळी सर्वधर्म समभावनेने पटवून दिले आहे. आज
भारताला बाबांच्या याच गोष्टी पुन्हा पुन्हा सांगायला हव्यात.

# श्री साईलीलाच्या सभासदांस निवेदन

'श्री साईलीला' मासिकाचे नवीन सभासद होऊ इच्छिणाऱ्या व वर्गणी संपलेल्या
सभासदांनी आपली वर्गणी श्री साईबाबा संस्थान शिरडी, मुंबई कार्या
साईनिकेतन, ८०४ बी, खोदादाद सर्कल जवळ, दादर, मुंबई–४०० ०१४.
प्रत्यक्ष/मनीऑर्डरद्वारे भरावी. चेक पाठवायचा झाल्यास, तो 'श्री साईबाबा सं
शिरडी' या नावावर असावा. मनिऑर्डर कोणत्या कारणासाठी करीत आहात, त
उल्लेख मनिऑर्डरवर करणे आवश्यक आहे. मनिऑर्डरवर 'संदेश के लिए स्थ
आणि 'भेजनेवाले का नाम व पूरा पता' असे नमूद केलेले असते, त्या दोन्ही ठिक
सभासदांनी आपले नाव व पूर्ण पत्ता लिहावा.

* श्री साईलीलाच्या संदर्भात पत्र-व्यवहार करताना, श्री साईलीलाच्या जु
सभासदांनी त्यांचा सभासद क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे.

* श्री साईलीलाच्या सभासदांनी आपली वर्गणी संपण्यापूर्वी किमान एक म
अगोदरच भरल्यास अधिक सोयीचे होईल.

# श्री साईबाबा महानिर्वाण विशेषांक

संत चूडामणि भगवान श्री साईनाथ महाराजांच्या महानिर्वाणास यंदा
विजयादशमीस सत्तर वर्षे पूर्ण होत आहेत. या निमित्ताने ऑक्टोबर १९८८ रो
प्रकाशित होणारा श्री साईलीलाचा अंक 'श्री साईबाबा महानिर्वाण विशेषांक' म्ह
प्रकाशित होईल. लेखकांनी विषय लक्षात घेऊनच लेख थोडक्यात, कागदाच्या ए
बाजूस भरपूर समास सोडून, स्वच्छ अक्षरात ३० जून १९८८ पर्यंत संपादक,
साईलीला, ८०४ बी, साईनिकेतन, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०००१
या पत्त्यावर पाठवावेत.

— का.

१६ मार्च १९८८

# गुढीपाडवा व त्याचे महत्त्व

यंदा तारीख १६ मार्च रोजी गुढीपाडवा आहे. हिंदूंचा नववर्षदिन. चैत्र शुद्ध प्रतिपदा. साडेतीन मुहूर्तापैकी शुभसूचक म्हणून मानलेला अग्रेसर मुहूर्त. इतिहासातील शालिवाहन शकाचा आरंभ. सर्व ऋतूतील राजा समजला जाणारा ऋतू वसंत याची सुरुवात. अशा अनेक घटनांचे प्रतिक म्हणून शुद्ध प्रतिपदेस भारतात असामान्य साधारण महत्त्व आहे. ज्योतिष-शास्त्रात या दिनास खूपच महत्त्व असून गत इतिहासकालीन घडामोडीत या दिनी भारतातील युग पुरुषांनी यश, विजय मिळविल्याच्या गोष्टी आपण ऐकतो. मर्यादा पुरुष प्रभू रामचंद्रांनी अयोध्या नगरीत १४ वर्षाची कठोर वनवास अवस्था भोगून प्रथम प्रवेश केला, तो याच दिवशी. पुराण ग्रंथात ज्याचे वर्णन "आंध्रभृत्य" म्हणून केले जाते. त्याचाच उल्लेख शिलालेखातून आंध्रराजघराण्यातील राजे सातवाहन म्हणून केलेला आढळतो. या सातवाहनाचेच अपभ्रष्टरूप शालिवाहन, ख्रिस्तपूर्व २३० ते ख्रिस्तोत्तर २२७ शालिवाहन राजाचा काल समजला जातो. सातवाहन या कुलनामाने विभूषित असलेल्या तीस राजांनी आंध्र देशात राज्य करुन इतरत्र राज्य विस्तार केला. त्यापैकी कोणत्या प्रसंगी शक सुरु झाला, याबद्दल वाद आहे. महाराष्ट्राच्या उपलब्ध इतिहासाच्या सुरुवातीस आद्य राजवंश म्हणून सातवाहनांचा उल्लेख आढळतो. आंध्रास राज्यातील धरणीकाट (घनकटक) ही सात वाहनाची मूळ राजधानी असली तरी गौतमी पुत्र व पुलमायी यांनी महाराष्ट्रात आपले राज्य स्थापून पैठण ही राजधानी निश्चित केली. त्यावेळी शक म्हणजे परकीय देशभर धुमाकूळ घालीत होते. तेव्हा या घराण्यातील राजांनी शकावर मिळविलेल्या विजयामुळेच शालिवाहन शक सुरु झाला असावा. हिंदु संस्कृतीतील अनेक गोष्टी चैत्र शु. प्रतिपदेला घडलेल्या आहेत, म्हणून प्रत्येक उत्सव या दिना पासून सुरु होतात. पुण्यपर्व म्हणून हिंदू या दिवशी घरासमोर गुढी तोरण उभारतात.

वैद्यकीय दृष्ट्या धन्वन्तरी लोक या दिवसास मानतात. मंगल स्नानादी कर्मे आटोपल्यावर कडू लिंबाची पाने, हिंग, मिठ, जिरे व ओंवा या सहभक्षण केल्याने आरोग्य, बल, बुद्धी व तेजस्वीता प्राप्त होते, असे आर्यवैद्यकांचे मत आहे. या दिवशीच्या मुहूर्तावर आरोग्यव्रत व विद्याव्रत करण्याची पद्धत आहे.

## नूतन वर्षाभिनंदन

शालिवाहन शकाप्रमाणे सुरु होणारे नूतन शके १९१० आमच्या साईभक्तांना, असंख्य वाचकांना, हितचिंतकांना, लेखक-कवींना सुखकर, समृद्धीकारक, भाग्यवर्धक ठरो, हीच श्री चरणी प्रार्थना.

माझ्या आठवणीतून-

# मी पाहिलेले साईबाबा – ३

## श्री. गजानन जयदेव उर्फ आप्पासाहेब चितांबर

– श्री. गजाननराव चित
एम. ए., बी.
'आकांक्षा,' सर्वोदय को-हौ. सोसा
बालिकाश्रमाचे पाठीमागे, अहमदन

**(नगरचे शिक्षण क्षेत्रात अण्णासाहेब कर्वे म्हणून श्री. आप्पासाहेबांचा लौकिक आ त्यांनी नगरला कन्याशाळेची स्थापना करुन महिलांना शिक्षणाची मंदिरे खुली क दिली. त्यांच्या सत्कार प्रसंगी त्यांना अर्पण करण्यात आलेल्या थैलीत त्यांनी आप भर घालून ती थैली आपल्या कन्याशाळेला अर्पण केली. साईचरित्रातील वाघ मुक्ती प्रसंग त्यांनी आपल्या डोळ्यांनी पाहिलेला आहे. सुविद्य आप्पासाहेबांना आ दीर्घायुष्य चिंतितो. – का. सं.)**



**श्री. ग. ज. चितांबर**

मी श्री साईबाबांना पाहिले व त अनेकदा दर्शन घेऊ शकलो म्ह पुष्कळच अगर सारेच साई-भक्त मी भाग्यवान पुरुष आहे असे मानतात स्वतःला खरोखरच भाग्यवान समजत यासाठी की मी साईबाबांना केवळ पा आणि त्यांचे अनेकदा दर्शन घेऊ श एवढेच नव्हे तर जो सत्पुरुष एवढा आहे की, ज्याला सारा भारतच काय, 'देव' आहे असे मानणारे जगातील देव-भक्त, साईबाबा एक देवावत आहेत, असे मानतात. अशा सत्पुरुषाज दिवसाचा कितीही वेळ घालवावा, त्यांचे मांडीवर बसावे, ते आपले आजोबा आ अशा थाटात त्यांच्याशी बोलावे व त्यांनी माझे कौतुक करावे, असे महत् भाग्य म लाभले. परंतु त्या वयात मला कळत नव्हते की आपण इतक्या मोठ्या अवत पुरुषाशी इतक्या जवळून बोलतो आणि हा सत्पुरुष आपले लाड करतो.

त्यावेळी मी इतका भाग्यवान होतो, हे अलिकडे – फारच उशीरा मला समज साईभक्तांची 'श्रध्दा आणि नितान्त भक्ति' ह्यामुळे ते मला त्यांच्यापेक्षा अधि भाग्यवान समजत असले आणि मला मान देत असले तरी, मी त्या दृष्टिने किती लह आहे, ह्याची जाणीव मला आहे, व ती जाणीव मी सतत जोपासतो. त्या

ाईबाबांविषयीच्या वाड्मयात भर घालणारे जे अनेक बुध्दिमान साईभक्त आहेत, त्या ोत माझा नंबर कोठेही नसेल, हे मी जाणतो. मी एवढेच म्हणेन की, . साईबाबांवर झी नितान्त श्रध्दा आहे आणि त्यांच्या आशीर्वादानेच मला जीवनात सर्व काही ळाले आहे.

मी अंधभक्त नाही, म्हणून सातत्याने, प्रामाणिकपणे परिश्रम करण्यावर माझा पूर्ण वास आहे. तरीही मानवाच्या प्रयत्नास यश येणे वा न येणे, हे त्याच्या एकट्याच्या ात नसते व सत्पुरुष पाठीराख्रा असल्याशिवाय प्रयत्नांना यश येत नाही, असे झे प्रामाणिक मत आहे, मग 'परमेश्वर' कोणत्या ना कोणत्या रुपाने आपल्या ठीशी असतो, ते रुप आपल्याला समजत नाही. म्हणूनच 'परमेश्वर' 'अदृश्य' रुपात असतो, असे सर्व धर्म सांगतात. कधी तो विष्णुरुपाने, कधी ्मा-विष्णू-महेशरुपाने म्हणजेच दत्तात्रयाच्या रुपाने, तसाच तो 'सा-ई'रुपानेही ट होतो, त्यामुळे मानवी रुप धारण केल्यानंतर त्याला जन्म-वाढ-कार्य व त्या देहाने लोक सोडून जाणे, ह्या मानवास डोळ्याने दिसणाऱ्या व जाणवणाऱ्या अवस्था कारावा लागतात व नंतर 'अनंतात' विलीन होणे क्रमप्राप्त होते, श्रीकृष्णालाही ते ले नाही.

'कर्मण्ये वाधि कारस्थे मा फलेषु कदाचन्' असे अर्जुनाला कृष्णाने सांगितले. असे युगपुरुष सर्व जगात झाले. तरीही तुलनेने भारतात भाषा, प्रांत, जात व धर्म ा सर्व बाह्य मानवनिर्मित मर्यादा ओलांडून कबीर, ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, खामेळा आणि साईबाबा ह्यांच्यासारखे अनेक युगपुरुष झाले आणि त्यांच्या ील देवत्वाची ओळख, सामान्य जनांना त्यांच्या देहावसानानंतरच प्रकर्षाने झाली. अनेक भारतीय व जागतिक संतांचे स्वरचित वाड्मय बऱ्याच मोठ्या प्रमाणात सिध्द आहे. श्रीकृष्णाने सांगितलेली गीता, ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी, नामदेवाची था, तुकारामाचे अभंग, कबिराचे दोहे आणि रामदासाचा दासबोध व मनाचे श्लोक ोरे सारख्या अनेक ग्रंथांचा उल्लेख करता येईल. परंतु तशा प्रकारचे साईबाबांनी वतः लिहिलेले कोणतेही वाड्मय अगर कोणताही ग्रथ मला माहीत नाही, हे कदाचित् ाझे अज्ञान असेल.

विशेष हे की ह्या सर्व सत्पुरुषांनी भारतात विविध ठिकाणी संचार करुन आपले त्वज्ञान प्रतिपादिले. परंतु साईबाबा जे एकदा एका लग्नाच्या वऱ्हाडाबरोबर शिर्डीत ाले, ते शिर्डीगाव त्यांनी आजन्म सोडले नाही. लिंबाच्या एका झाडाखाली बसून ांनी आपल्या गुरुची (त्यांचे नाव त्यांनी कोणासही सांगितले नाही) तपश्चर्या केली व थेच त्यांना आत्मज्ञान प्राप्त झाले, असे सांगतात. तो निम्बवृक्ष जेथे अद्याप उभा आहे, ाचेखाली संगमरवरी दगडावर एक शिलालेख आहे तो लिंब ज्या वाड्यात होता आहे), त्या वाड्यात दोन बाजूला समोरासमोर बांधलेली जुन्या पध्दतीची शेणाने सारवण्याची घरे होती. त्यापैकी लिंबाच्या पाठीशी (शिलालेखाच्या पाठीशी) असलेल्या वाड्यात आम्ही (माझे वडील-आई व मुले - चितांबर कुटुंबिय) १९२०



नंतर रहात असू. त्या ठिकाणी आता साईसंस्थानने बऱ्याच मोठ्या इमारती बांध
आहेत.

माझा जन्म शिर्डीचा. साईबाबांच्या मशिदीच्या (आता ह्या इमारतीस द्वारका
म्हणतात) पूर्वेस असलेल्या एका घरात त्यावेळी माझे वडील (कै. दाजी उर्फ ज
वामन चितांबर) रहात असत. त्यांना आम्ही मुले 'आण्णा' म्हणत असू. आणि आ
'बाई' हाक मारीत असू. आण्णा शिर्डी येथील लोकल बोर्डाच्या मराठी शा
मुख्याध्यापक होते. त्यांच्याचकडे पोस्टाचेही काम असे. माझे दोन थोरले
संगमनेरी शिकायला असत. कारण शिर्डीची शाळा फक्त मराठी चौथी पर्यंत ह
माझ्या थोरल्या बहिणीचा विवाह माझ्या जन्मापूर्वीच झाला होता. त्यामुळे घरा
आण्णा, ति. सौ. बाई व मी असे आम्ही तिघेच. ति. आण्णा शाळेत गेले की
साईबाबांच्या मशिदीत जाई व त्यांचे जवळ बसत असे. त्यांच्या समोर नेहमी
(अग्नि) असे. आता जेथे 'बसलेला' मोठा फोटो आहे, तेथे ते लोडाला टेकून ब
त्यांच्या उजव्या हाताच्या भिंतीत जमिनीपासून तो आढ्यापर्यंत एक सुमारे तीन
रुंद व एक फूट खोल असे बिन दारांचे व बिन कप्प्यांचे कोनाडे होते. त्यात भले
शिळे हार किंवा फुलांचे गालिचे असलेल्या चादरी लोंबत असत. मी चारच व
असल्यामुळे त्यावेळेच्या नियमानुसार मला शाळेत जाता येत नव्हते. त्या का
कच्चीत (आता आपण मॉंटेसरी म्हणतो) नाव घालण्यासाठी सहा वर्षांची अट होत
माझे वडील अति कठोर व तंतोतंत नियमांचे पालन करणारे असल्यामुळे, मल
शाळेत नेत नसावेत. शाळेत (शिकण्यासाठी) जावे, हे माझ्या गावीही नव्हते
साईबाबांजवळ इतका रमून जाई की, मी त्यांच्या स्नानाच्या वेळीही तेथेच असे. ए
रात्री असाच त्यांच्याजवळ बसलो होतो. झोपायची वेळ झाली होती म्हणून माझी
मला न्यायला आली. तिला माझा खूप राग आला होता. ती मला घरी घेऊन ज
लागली. मी जाईना. तेव्हा तिने मला बखोटीला धरुन कडेवर घेतले व घराचा र
धरला. मशिदीतून बाहेर गेल्यावर तिने मला एक चापट मारली व ती मला रागावल
ते ऐकून तेथे असलेल्या एका इसमाला बाबांनी हाक मारुन सांगितले, "त्या बाईं
बोलावले आहे असे सांग." त्याचा निरोप मिळताच बाई साईबाबांकडे परतली. त
त्यांनी माझ्या आईला सांगितले, "हे पहा, हा तुझा गेल्या जन्मीचा बाप आहे अ
त्यावेळचा माझा मित्र आहे. ह्याला पुन्हा मारु नकोस." माझ्या आईने मला
मारल्याचे मला आठवत नाही. ह्या सर्व प्रसंगांची आठवण माझ्या आईने एका प्रसं
माझ्या वडिलांना सांगितली. तो प्रसंग नंतर सांगेन.

ह्या काळात साईबाबांची दुपारची आरती झाली की ते एका पायरीवर उभे रा
आणि नैवेद्यासाठी भक्तांनी आणलेल्या सर्व ताटामधील अन्न, दर्शन घेणाऱ्या (प
पडणाऱ्या) उपस्थितांना वाटून टाकीत. मात्र सुरुवातीस त्यांच्या नैवेद्याच्या
ताटलीतील बर्फीच्या मुदी ते वाटीत. सुमारे ३० ते ३५ छोट्या मुदी असत. ज्यांना
भरण्यासाठी अन्नाची जरुरी नव्हती, अशांना ते थोडीशी बर्फी देत. त्यातील

छोटीसी मूद सर्व प्रथम मला मिळे. माझी आई तो प्रसाद बांधून ठेवी व दिवसभरात परगावांहून वेळीअवेळी दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांना,ते घरी आल्यास थोडासा प्रसाद देत असे.

एके दिवशी मी आजारपणामुळे आरतीला जाऊ शकलो नाही, तर त्यांनी प्रसाद वाटण्यास सुरुवात करताना माझा तपास केला व आरती करणाऱ्या पुजाऱ्याबरोबर बर्फीची छोटीशी मूद आमच्या घरी पाठवली. त्यामुळे आमच्या घरातील सर्वांनाच आनंद झाला आणि दूरदूरच्या साईभक्तांना हा प्रसाद देण्यातील त्यांचा आनंद दुणावला. हे कर्तव्य पार पाडण्यातील आनंद इतरांना हल्लीच्या काळात कळणे कठीण आहे, अशी आजची स्थिती आहे. "आपल्या जवळ जे काही थोडे चांगले आहे,ते ज्यांना गरज आहे,त्यांना दिले पाहिजे" ही गोष्ट तेव्हापासून माझ्या मनावर बिंबली आहे. असे करताना आपण कोणावरही उपकार करीत नसतो. घेण्यापेक्षा गरजूंना देण्यात जास्त आनंद असतो.

साईबाबांनी न बोलता, अबोल राहून केवळ कृतीतून जगाला फार मोठी शिकवण दिली. आपल्या अशा परोपकारी कृतीची त्यांनी वाच्यताही केली नाही. गाजावाजा तर दूरच. ह्या घटनेशी संबंध नसलेली एक मजेशीर आठवण सांगावी,असे मला वाटते. एक दिवस मी दुपारी चारच्या बेतास असाच साईबाबांजवळ बसलो होतो. अगदी लहान मुलाशी बोलतात तसं ते माझ्याशी बोलत होते. बाबा मला म्हणाले, "वडिलांकडे जा. त्यांना म्हणावं, बाबांनी दक्षिणा मागितली." मी "बरं" म्हटलं आणि लगेच आण्णांकडे शाळेत गेलो. त्यांना बाबा काय म्हणाले ते सांगितल्यावर त्यांनी मला 'चवली' दिली. (त्या काळात एक अगदी छोटे गोल दोन आण्याचे नाणे असे.) चवली घेऊन मी बाबांकडे गेलो. बाबांना चवली दिली. दक्षिणा दिली हे मला समजत नव्हते. मी त्यावेळी बाबांच्या पाया पडलो नाही दिवसभर अगदी लहान मूल घरात वागते,तसा मी त्यांच्याशी वागत होतो. बाबांनी ती घेतली आणि लगेच म्हणाले, "ही चवली आता वडिलांना परत नेऊन दे. मी तुझी गंमत केली." मी ती घेतली आणि परत आण्णांकडे गेलो. त्यांना बाबा काय म्हणाले ते सांगितले. त्यावर आण्णा म्हणाले, "अरे एकदा दिलेली दक्षिणा परत घेत नसतात. जा आणि बाबांना देऊन टाक." मी परत बाबांकडे गेलो आणि आण्णा काय म्हणाले ते सांगून त्यांना ते नाणे परत केले. मग मात्र त्यांनी ते घेतले. "कशी गंमत झाली", असं त्या वयात मला वाटलं. नंतर मात्र जसजसं वय वाढू लागलं,तसं तसं "एकदा दिलेलं दान परत घेऊ नये" हे माझ्या मनावर चांगलच ठसलं आणि 'ऐपतिप्रमाणे दान करावं आणि ते परत घेऊ नये' हा धडा मी शिकलो आणि माझ्या परीने गिरवला.

साईबाबा समाधिस्थ झाल्यानंतरची गोष्ट. मी सुमारे १४ वर्षांचा होतो. तालुक्याच्या गावीही इंग्रजी शाळा नव्हत्या आणि घरचे दारिद्य. त्यामुळे मला माझ्या थोरल्या बहिणीच्या नणंदेकडे नाशकास पुढील शिक्षणासाठी रहावे लागले. त्या गंगाभागीरथी होत्या. त्यांना आम्ही बबूआत्या म्हणत असू. त्यांच्याकडे पंढरपूरला

दरवर्षी जाणाऱ्या एक मराठाबाई असत व त्या बाईंचा मुलगा असे. आत्याबाई ज्या अन्नछत्रात स्वयंपाकासाठी होत्या, त्या अन्नछत्रात मला त्या आठवड्यात एकदा-दोनदा जेवायला नेत असत. मी वार लावण्याचाही प्रयत्न केला. एके दिवशी आत्याबाईंच्या देवघरातील देवाजवळच्या अक्षदा (तांदूळ) ठेवण्याच्या डबीतले चार आणे चोरीस गेले. त्या मला म्हणाल्या, "हा दुसरा मुलगा ब्राह्मण नाही, तो देवाजवळ कसा शिवेल? तूच हे चार आणे चोरलेस." मी त्यांना पुष्कळदा सांगितले "मी चोरले नाहीत." पण त्यांचा विश्वास बसेना म्हणून मी माझ्या वडिलांना शिर्डीस ही हकीगत पत्राने कळविली. त्यांचे मला उलटटपाली पत्र आले, "तुझ्याजवळ भाड्याला पैसे नसल्यास पुस्तके विकून पैसे कर आणि येथे निघून ये. असा आळ अगर आक्षेप सहन करु नकोस. तुला श्रीमान बुटी नागपूरला शिकायला नेतील."

मी हे पत्र वाचून हुरळलो. आपल्या वडिलांचा आपल्यावर विश्वास आहे, ह्याचा मला खूप आनंद वाटला. मी खरोखरीच पुस्तके विकली. भाड्यापुरते पैसे मला मिळाले. शाळेत (न्यू इंग्लिश स्कूल) मुख्याध्यापकांना (मा. भागवत ह्यांना) पत्र दाखविले. त्यांनीही माझा एक वार घेतला होता. त्यांनी मला शाळा सोडल्याचा दाखला दिला. मी सर्व सामानासह (पुस्तके, वह्या, अंथरुण, पांघरुण) शिर्डीला आलो.

शिर्डीला पोहोचल्यावर माझा भ्रम निरास झाला. कारण श्रीमान् बुटींनी मला नागपूरला नेले नाही. मी आईला विचारले. ती म्हणाली– "अरे बाबा, ह्या बुटींना भविष्य येतं, ह्यांनी तुझी कुंडली त्यांना दाखविली. ते म्हणाले, "ह्या मुलाचं शिक्षण होणार आहे." ह्यांना वाटलं की, बुटी तुला नागपूरला नेतील, कारणत्यांच्याकडेखूप मुले शिकायला आहेत. कसचं काय अन् कसचं काय?"

मी निराश झालो आणि घरासमोर असलेल्या साईबाबांच्या गुरुस्थानास व निंबवृक्षास रोज १०८ (एकशे आठ) प्रदक्षिणा घालू लागलो. लवकरच मला अहमदनगरच्या त्यावेळच्या अनाथ विद्यार्थी-गृहात प्रवेश मिळाला. आणि त्यामुळेच मी इंग्रजी ४थी इयत्तेनंतरचे शिक्षण घेऊ शकलो. मध्यंतरीच्या काळात माझी कोठेच शिक्षणाची सोय न झाल्यामुळे मी शिर्डीसच होतो. त्याकाळात माझ्या नाकाच्या हाडाच्या उजव्या बाजूस एक 'मस' आला. तो वाढू लागला. त्यावेळी मुंबईचे एक डॉक्टर आजारी झाल्यामुळे शिर्डीला हवा पालटण्यासाठी आले होते. ते रोज सायंकाळी फिरायला जाताना मला घरी बोलावणं येई. मी त्यांच्याबरोबर रोज सायंकाळी फिरावयास जाई. आईने मला विचारले, "हे गृहस्थ कोण आहेत?" मी तिला 'ते मुंबईचे डॉक्टर आहेत' असं सांगितलं. त्यावर ती म्हणाली, "अरे, तुझ्या नाकावर आलेला मस त्याना दाखवून काय औषध करावं ते विचार." त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी फिरायला गेल्यावर त्यांना मी विचारलं. ते म्हणाले, "नाकाच्या त्या भागात एक पिशवी असते. त्या पिशवीत अश्रू साठून ते थिजलेत. त्याचे ऑपरेशनच करावे लागते, आणि ते फक्त मुंबईलाच होईल. (तो काळ १९२७ च्या बेताचा) ह्याला ७५/- रु. खर्च

पडेल. हा फक्त ऑपरेशनचा खर्च, जाण्या-येण्याचं भाडं, मुंबईत रहाणं आणि कोणी सोबत पाहिजे," हे सर्व मी आईला सांगितलं. ती म्हणाली, "हरे राम!"



बाबांच्या समोर वाघाला मुक्ती मिळाली, ह्या साईचरित्रातील वर्णिलेल्या प्रसंगाचे चित्र.

ह्यावर तिला मागील घटनेची आठवण झाली की, बाबांनी आपल्याला सांगितलं होतं, "हा मागील जन्मातील माझा मित्र आणि तुझा बाप आहे. त्याला पुन्हा मारु नकोस." आणि तिला आठवलं की, आपल्या वडिलांच्या नाकावर असाच 'मस' होता. ह्याचं नाव तरी बदलून (ठेवून) पहावं. ती आपल्या वडिलांना "आप्पा" हाक मारीत असे (मला त्यांचे पूर्ण नाव माहीत नाही. ह्याचे मला आता फार वाईट वाटते.) तिन्ही सांजेला देवापुढे समई लावून झाल्यावर आण्णांनी मला देवघरासमोर उभं केलं. मला साईबाबांची उदी लावली. त्यावेळी माझं नाव 'आप्पा' ठेवल्याचं साईबाबांच्या फोटोकडे पाहून सांगितलं, आणि नवीन नाव ठेवल्याबद्दल देवापुढे साखर ठेवून साखर वाटली.

त्या दिवसापासून मला (आई आणि वडील) सौ. बाई आणि आण्णा 'आप्पा' याच नावाने हाक मारु लागले आणि आश्चर्याची गोष्ट अशी की, माझे ते 'मस' हळूहळू आकाराने कमी होऊन चारदिवसांनी दिसेनासे झाले. ह्याचे त्या डॉक्टरांनाही आश्चर्य वाटले. मी आता ७३ वर्षे पूर्ण करुन ७४व्यात प्रवेश केला आहे. मला (जुन्या) एफ.वाय.ला ३५ साली शास्त्रात विशेष गुणवत्ता मिळाली आहे. (Distinctionसह) माझा शास्त्रीय कारण परंपरेवर पूर्ण विश्वास असूनही वरील घटना मी नाकारु शकत नाही. कारण ती घटना मी अनुभवली आहे.

मी दुसरी एक पाहिलेली घटना येथे मला सांगण्याचा मोह होतो. बाबा असतानाची

गोष्ट. शिर्डीत एके दिवशी दोन-तीन माणसे एका मोठ्या लाकडी पिंजऱ्यात एक भल
मोठा वाघ घेऊन आली. एका माणसाच्या हातात दोन मोठाल्या भरपूर रूंद पितळेच्य
कड्या होत्या. त्यांचा आवाज मोठी झांज वाजविल्यासारखा खळ-खळ होई. त
माणूस आपला हात सारखा हालवी, आवाज करी व पिंजऱ्याभोवती हिंडे आणि
बाहेरुन एका लांब काठीस लावलेल्या भाल्याच्या टोकाने त्या वाघास टोची. त्यामुळ
वाघ संतापून अक्राळ-विक्राळ तोंड करुन डरकाळी फोडी व जसा जसा तो माणूस
फिरे, तसातसा वाघ आपल्या अंगाभोवती (अंगाला भाला टोचला की) फिरे. त्य
खळ-खळ आवाजाने खूप गर्दी जमे. थोड्या वेळाने ही माणसे हात पुढे करुन भीक
मागत. अशा तऱ्हेने गावोगाव जाणे व पैसा मिळविणे, हा त्यांचा धंदा असावा.

ते शिर्डी गावातून गावभर फिरुन गावाबाहेर पडताना मशिदीजवळील वेशीजवळ
आले आणि त्या दोघांनी त्या वाघाला खूपच जाड अशा भल्या मोठ्या दोरखंडाने
दोन्ही बाजूस लांब अंतरावर धरुन, दोन्ही बाजूंनी सारखा जोर देऊन, मारुतीच्य
देवळात नेऊन मारुतीच्या पाया पडायला लावले आणि नंतर मशिदीत येऊन श्री
साईबाबांच्या पाया पडावयास लावले. बाबा पहिल्या पायरीवर उभे होते. वाघाने
आपले मस्तक बाबांच्या पुढे टेकले मात्र आणि वाघाने प्राण सोडला. सर्वजण म्हणाले
बाबांनी वाघास मुक्ति दिली. तो स्वर्गवासी झाला. ह्या साऱ्या प्रसंगाच्या व त्या
वाघाच्या स्मरणार्थ त्या वाघाची जी प्रतिमा तेथे आता बसविली आहे, ती फारच लहान
आहे. तो सर्कशीतल्या वाघासारखा खूपच मोठा व अक्राळ-विक्राळ होता
वाघासारख्या जंगली क्रूर प्राण्याचे हाल करणारी व त्याची खेळणी करणारी माणसे
वाघापेक्षाही जास्त जंगली व क्रूर असतात. म्हणूनच "ह्या माणसांच्या हातून मला
सोडवा" अशी त्या वाघाने केलेली आर्त प्रार्थना बाबांच्या हृदयापर्यंत पोचली आणि
त्यांनी त्याला ह्या जाचातून कायमचे मुक्त केले. हा प्रसंग पहाणारे सर्वजण म्हणाले,
"बाबांनी ह्या वाघाला मुक्ति दिली व स्वर्गात पाठविले."

श्री साईबाबांनी धारण केलेल्या मानव देहाचा त्याग केला, तोही दसऱ्यासारख्या
शुभ दिनी. त्यांनी खऱ्या अर्थाने सीमोल्लंघन केले. व ह्या पृथ्वीवरील सर्व सीमा
ओलांडून ते अनंतात विलीन झाले. त्या दिवशीची दुपारची आरती झाली. सर्व भक्त
मंडळी आपापल्या घरी गेली आणि बाबांनी मला सांगितले, "तू आता घरी जा— मला
झोपायचंय." बाबांनी अंग पसरले. पांढरा स्वच्छ कपडा पांघरला. मी घरी गेलो.
दुपारी चारच्या सुमारास गावात एकच गडबड सुरु झाली. मशिदीभोवती खूप गर्दी
जमली होती. "बाबा गेले" ही वार्ता क्षणार्धात गावभर पसरली. मला आई-वडिलांनी
बाहेर जाऊ दिले नाही. काही वेळाने बाबांची अंत्ययात्रा निघाली. चार-सहा चाके
असलेली गाडी होती. तिच्यावर सर्व बाजूंनी गोल आच्छादन तयार केलेले होते. त्यावर
अगदी पांढरे स्वच्छ कापड सर्व बाजूंनी नीटनेटके घातलेले होते. गाडी ढकलली जात
होती. सर्व गाव लोटला होता. अवती भोवतीच्या खेड्यातील लोकही आले होते. शिर्डी
गावाची त्यावेळची लोकसंख्या फारच कमी होती. परंतु गावातील सर्व रस्ते माणसांनी

...च भरलेले होते. आण्णा-बाईही (वडील व आई) दाराशी बाहेर रस्त्यावर येऊन ...त होते. तेवढ्यात मी खूप पुढे गेलो. ती ढकलगाडी पाहिली, तिला ओढण्यास ...वा ढकलण्यास दांडे नव्हते. ताटीही नव्हती. यात्रा पुढे गेल्यावर मी घरी आलो ...णि वडिलांच्या हातचा खूप चोप मी खाल्ला. कारण मला बघ्या (हरिजन हा नवीन ...द.) अस्पृश्यांचा विटाळ झाला, अशी त्यांनी त्या काळात कल्पना करुन घेतली. ...णि मला आईने भरपूर गार पाण्याने दुरुन स्नान घातले.

ही यात्रा गेली कोठे? गावातील त्यावेळच्या प्रमुख रस्त्यांनी ही यात्रा हल्लीच्या श्री ...ईबाबांच्या मंदिरापाशी नेली होती. देऊळ बांधून होत आले होते– "आणि त्यात ...ठ्ठलाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करा" असे बाबांनी नागपूरच्या बुटींना सांगितले ...ते. बुटींनी ते मंदिर बांधले होते. जरी बाबांनी देऊळ पूर्ण झाल्यावर विठ्ठलाच्या ...र्तीची प्रतिष्ठापना करा, असे सांगितल्याचे लोक सांगत होते, तरीही बाबा जेव्हा रोज ...र्विधीस मशिदीतून गावाबाहेर जात, तेव्हा ते कोणी भेटल्यास बोट दाखवून सांगत ...मी गेल्यानंतर इथे रहाणार आहे." हे शिर्डीतील बऱ्याच व्यक्तींना माहीत होते म्हणून ...व शिर्डीकरांनी ठरविले की, बाबांची येथेच समाधी करावी.

श्री साईबाबा मुसलमान होते की हिंदू होते, यावर कोणीही कधीही वाद घातला ...ही. ते एका मुसलमानी घरातील लग्नाच्या वऱ्हाडाबरोबर आले होते, परंतु त्यांची ...रती होत होती, ती त्यांना मान्य होती. यांच्या समोर सतत अखंड धुनी (अग्नी) असे ...ती धुनी अद्यापही आहे, त्या अर्थी ते अग्निपूजक होते.

भक्त बाबांची आरती करु लागले. ती बाबा रोज ऐकत आणि त्यांनी त्या ओळींना ...काव्यांना कधीच हरकत घेतली नाही. ह्याचाच अर्थ तो सर्व आशय त्यांना मान्य ...ता. उदाहरणार्थ:

"कलियुगी अवतार सगुण ब्रह्म साचार ।
अवतीर्ण झालासे । स्वामी दत्त दिगंबर ॥ वगैरे–

...आणि

यवनस्वरुपी ऐक्या दर्शन त्वा दिधले (वगैरे)

...आणि –

भेद न तत्त्वी हिंदूयवनांच्या कांहीं
दावायासि झाला पुनरपि नरदेहीं । वगैरे–

...आणि–

ऐसा येईना । साई दिगंबरा । अक्षय रुपावतारा ।
सर्वहि व्यापक तू । श्रृति सारा । अनुसया अत्रिकुमारा ॥

अशा अनेक ओव्या किंवा ओळी उध्दृत करता येतील. याचा सरळ अर्थ होतो व निष्कर्ष निघतो की, आपण यवन आहोत आणि दत्त-दिगंबरही आहोत, हे भक्तांनी ओळखले. हे साईबाबांनी अंतर्यामी जाणले. आणि त्यातून "जाति-धर्म-भेद नष्ट करुन भक्तांनी परमेश्वरास आळवावे व आपल्या जीवनाचे अंतिम ध्येय गाठावे," हाच

त्यांचा संदेश आहे. हा संदेश आरती व स्तोत्रे ह्यांतून केवळ गाऊन स्वस्थ न ब
सर्व समाजाची जाति-धर्म निरपेक्ष एकता साईबाबांच्या खऱ्या भक्तांनी निर्माण क
पाहिजे.

त्यांचा वेष मात्र कफनी व डोक्याला मुस्लिम पद्धतीने बांधलेले पांढरेच फड
असा असे. ते फडके हिरवे अगर इतर कोणत्याही रंगाचे कधीच नव्हते. त्यामु
साईबाबांचे हल्लीचे रंगीत अगर भगव्या कपड्यातीलही – फोटो मला बिलकु
आवडत नाहीत. देव तसा भक्त बनण्याऐवजी, भक्त तसा देव भक्त मंड
बनवितात. देवाला देवस्वरुपच राहू द्यावे, अशा मताचा मी आहे.

मी शिर्डीस "श्री साईलीला" मासिकाच्या वार्षिक मेळाव्यास जातो, त्यावेळी
साईबाबांना पाहिले असल्यामुळे दूरदूरहून आलेले साईभक्त जेव्हा माझ्या पाया
लागतात, तेव्हा मला तेथून पळ काढावासा वाटतो. कारण तेवढ्याच एका कारण
"माझ्या पाया पडावे" ही पात्रता माझी नाही, हे मी मनोमन जाणतो. अशा भक्ता
मला दुसऱ्यांनी केलेल्या काव्य पंक्तीत सांगावेसे वाटते.

"ज्ञानियांचा राजा गुरु महाराज...
पायिची वहाण पायी बरी."

आपण गुरुचे स्थान व स्वतःची पात्रता जाणावी, हे विचार व्यक्त करता
योगायोग म्हणूनही असेल, खालील ओळी माझ्या कानावर पडल्या–

"ज्ञानोबा, नामदेव, तुकाराम
सावता माळी, गोरा कुंभार
हाच आपुला आधा ऽ र" वगैरे–

ज्ञानोबा, नामदेव, तुकाराम, सावता माळी आणि गोरा कुंभार ह्यांपैकी एखाद्या
पाहिलेल्या व भक्तिभावाने दर्शन घेतलेल्या व्यक्तींना आपण भाग्यवान मानले त
अशा संतांच्या दर्शनात आनंद मानून, फक्त दर्शन घेऊन मोकळ्या होणाऱ्या व्यक्तीं
ह्या संतांचा एखादा देखील गुण अंगी बाणविला नसेल तर केवळ इतक्या मोठ्
खऱ्या संतांना पाहिले म्हणून त्यांच्या पाया पडून काय उपयोग?

तरीही मला वाटते, की नामस्मरणाचा ध्यास धरल्यास, त्यात रममाण झाल्यास त्
कालापुरती तरी मानव आपली दुःखे विसरतो व त्याला मनःशांती मिळते. म्हणून
काही संत एकत्र आले की म्हणतात –

"ऐका जमला संत मेळा
अवघे विठ्ठल विठ्ल बोला ॥

असे गीत गाऊन विठ्ठल नामाचा गजर करतात. त्याप्रमाणे साई भक्तांनीही म्हणावे

ऐका जमला संत मेळा
अवघे साई साई बोला ॥

रामनवमी निमित्त खास लेख

# सर्वांना रमविणारा राम

– श्री. म. वा. करंबेळकर
रघुनाथ निवास, चेंबूर गावठाण
मुंबई - ७१

मर्यादा पुरूषोत्तमाचा जन्म चैत्र मासी, शुक्ल पक्ष, नवमी तिथी, पुनर्वसु नक्षत्र, कर्क लग्नी पाच ग्रह उच्चीचे असता झाला. ज्योतिष शास्त्राप्रमाणे कर्क राशीला (पुनर्वसु ४ था चरण) 'ही' हे अक्षर बालकाचे नावाकरिता येते परंतु ब्रह्मज्ञानी वशिष्ट महामुनींनी 'रा' हे तुळ राशी प्रधान अक्षर घेतले. दशरथ राजाला खुलासा करताना वशिष्ठ ऋषी म्हणतात,

"यस्मिन रमन्ते मुनयो विद्यया ऽ ज्ञान विप्लते ।
तं गुरू प्राह रामेति रमणाद्राम इत्यपि ॥"

ज्ञानाच्या योगे अज्ञानाचा नाश केल्यानंतर ज्याच्या ठिकाणी मुनिजन रममाण होतात, असा तो (वडील मुलगा) सर्वांना रमविणारा असल्यामुळे गुरुनी-वशिष्ठांनी त्याचे नाव 'राम' असे ठेविले.

दुसरा असा विचार सुचतो की, सर्व राशींचा स्वामी, सर्व ब्रह्मांडाचा स्वामी 'राम' हाच आहे. त्यामुळे व्यवहार पध्दतीप्रमाणे राशीचे नाव ठेवण्याचे प्रयोजन रामाला नाही. सर्व दृष्य स्थावर जंगम हे जड तत्वाचे आहे. जड वस्तू चालू शकत नाही किंवा काहीही करु शकत नाही. ज्यावेळी त्यात चेतन शक्ति निर्माण होईल किंवा चेतन देणारा त्याला धरील तेव्हाच ते कार्य करु शकते.

मानस पुजेत 'रं' तेजात्मकं असे म्हटले आहे. म्हणजेच 'र' हे चेतन संज्ञात्मक असल्यामुळे सर्वांना चेतन देणारा; सर्व ब्रह्मांड व्यापलेला असा हा राम असल्यामुळे तसेच मायेनेही रामाचा (ब्रह्म) आधार घेऊनच हे विश्व उत्पन्न केलेले आहे. असा हा राम ब्रह्मांडात असूनही आपणामध्येही आहे. मात्र आपण त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न करीत नाही. श्री समर्थ रामदासस्वामी मनाचे श्लोकात म्हणतात,

सदासर्वदा राम संन्निध आहे
विचारे मना सत्य शोधूनी पाहे
अखंडित भेटी रघुराज योगू
मना सांडी रे मी पणाच्या वियोगू

जगात ज्या ज्या मंगल वस्तू आहेत किंवा ज्या ज्या चांगल्या म्हणून गणलेल्या आहेत, त्यात मुख्य तत्व 'राम'च आहे आणि म्हणूनच त्या मंगलरुप झालेल्या आहेत.

श्री भगवान शंकर म्हणतात,

ततो जगन्मङगल मंगलात्मना, विधाय रामायण किर्ती मुष्माम
चचार पूर्वा चरितं रघुत्तमो राजर्षिवर्यै रभि सेवितं यथा ॥

अर्थ - "(पार्वती !) रघुत्तम राम म्हणजे जगतात ज्या काही मंगलरुप - कल्याणरुप -

गोष्टी आहेत, त्या सर्वांस मंगलत्व देणारी प्रत्यक्ष ब्रह्मानंद मूर्तिच होय. अशा त्या श्री रामाने आपल्या चरित्राच्या आधारावर अनेक रामायणे होतील अशी उत्तम कीर्ती संपादन केली. अनेक रामायणे झाली आणि पुढेही होतील तथापि रामायणाची तृप्ती होत नाही. रामायण हे अवीट आहे. राम कथा ही पापविनाशी भागिरथीच आहे. नित्य तिच्या स्नानाने, चिंतनाने, ह्रदयात असणारा 'राम' कळून येईल. मी रामरुप आहे, सर्व प्राणीमात्रात रामच आहे, अशी भावना निर्माण होईल व संसारी दु:खाची तमाच राहणार नाही.

श्री साई समर्थांनीही एके ठिकाणी फक्त गुरुमंत्र दिला आहे, 'राजाराम' म्हण म्हणून सांगितले. यातही गूढ आहे. 'राजा' तूच राम आहेस मात्र ते तुला कळत नाही कारण देह बुध्दी तुला फसवते म्हणून नित्य नामस्मरण ठेव. ब्रह्माबरोबर अनुसंधान ठेव म्हणजे प्रकृती (राजा स्वत: तू) खोटी असून त्यात असणारी चेतन शक्ति खरी आहे, हे कळून येईल, त्यानंतरच तुला खरा आनंद प्राप्त होईल. ब्रह्मानंदाच्या एका अंशावर इतर सर्व (भुते) आनंद पावतात अशी श्रुति आहे.

'तस्यैवानन्दस्यान्यानिमात्रामुपजीवन्तीति'

राष्ट्रीय कीर्तनकार कै. डॉ. पटवर्धन यांनी एका रोग्याला झोप येत नसे म्हणून त्यावर औषध म्हणजे तुळशी बागेतून तुळशीची माळ आणून 'राम' म्हणण्यास सांगितले. रामनामाचा जप सुरु झाला व त्यामुळे त्याला झोप येऊ लागली. श्री शंकरांनी विषाचे दाहावर 'रामनाम' हेच औषध घेतले व ते शांत झाले.

श्री साईनाथांचे सान्निध्यातील काही मंडळींचे असे विचार होते की, ' आपली कुंडली वा आपला हात कोणालाही ज्योतिष बघण्याकरिता दाखववावयाचा नाही. आपले ज्योतिष बघायचे नाही व दुसऱ्याचे सांगावयाचे नाही. कारण ज्योतिष शास्त्रामुळे ग्रहावर विश्वास बसून 'साईरामावरील' कमी होईल व तेच नेमके घाताला बोलावणे होईल. गुरु, रवि, शनि, राहू, केतू वगैरेंमध्ये चेतन असणारा 'राम' साईरामातही आहे. आपण त्याचाच आश्रय घेऊ म्हणजे जात्यात लोखंडी दांड्याजवळ रहाणारे गहू जाते फिरूनही भरडले जात नाहीत, तशीच अवस्था साईचा आश्रय घेणाऱ्याची आहे. मात्र इथे विश्वास, श्रध्दा यांची गरज आहे. मानसपुजेत 'सं' सर्वात्मकं असे म्हटले आहे. आपण तोच आधार घेऊन 'सं' सर्वात्मक 'श्री साईनाथम्', ज्याच्या स्मरणाने आनंद निर्माण होतो, सर्व ठिकाणी साक्षी - असा दृष्टोत्पत्तिस येतो, शिर्डीला रामजन्मोत्सव सुरु करुन रामाने रामाचा उत्सव करुन सर्व शिर्डीत रामचैतन्य जागृत केले, तो 'साईराम' त्रेतायुगात राम नावाने रमविणारा व आज 'रघुपती राघव राजाराम पतित पावन साईनाम' ह्या भजनाने रमविणारा, सर्वांचे हृदय चोरणारा द्वापारीचा कृष्ण आज बुट्टीचे वाड्यात बसला आहे. 'रामा' तुझी लीला मी काय वर्णन करणार? माझी एकच प्रार्थना, तू कुठेही अस, काहीही कर, परंतु ह्या दासाचा विसर पाडू नकोस व तुझे नाम अंत:कालापर्यंत मुखाने यावे, हीच प्रार्थना!

## साई दरबारातील माणिक आणि मोती... ५

# श्री. लक्ष्मण गणेश उर्फ काकासाहेब महाजनी



काकासाहेब महाजनी

– सौ. सरोजिनी मुळये
सरस्वती सदन, ७ नाथमंदिर कॉलनी,
इंदूर (म.प्र.).

कै. लक्ष्मण गणेश महाजनी, यांना सर्वजण काका म्हणत असत. त्यांचा जन्म १८७४च्या सुमारास झाला. घोटाळा होऊ नये म्हणून साईबाबांनी, तीन भक्त काका होते, त्यांना निरनिराळी नावे दिली. महाजनींना "बडे काका", दिक्षितांना "लंगडे काका" व निमोणकरांना "म्हातारे काका" याप्रमाणे.

काका महाजनी साईबाबांचे निःसीम भक्त होते. त्यांच्या आज्ञेशिवाय ते कोणतेही म करीत नसत. शिर्डीला कुठलाही उत्सव असला की, हे प्रथम हजर रहात असत. ांना बाबांनी सांगून ठेवले होते की, तू माझा दहावा दिवस कर.

ते रोज सकाळी उठून, बाबांपुढे बसून, एक तारीवर भजन करीत असत. रोज न्ही वेळा भजन, पूजन व आरती ते स्वतः करीत असत. दर गुरुवारी साईबाबांना र व शिऱ्याचा नैवेद्य करीत असत. त्यांना गाण्याचा फार शौक होता. त्यांच्याजवळ र्गन होता, तो ते स्वतः दोन्ही हातांनी वाजवीत असत. त्यांना नाटकांचाही खूप शौक ता. त्या काळी किर्लोस्कर कंपनीची नाटके होत असत. त्यांत बाल गंधर्व काम करीत सत, ती नाटके पाहिली व पुढे बालगंधर्व यांची स्वतंत्र नाटके होत होती, ती सर्व ांनी पाहिली. कथा-कीर्तनांचीही त्यांना खूप आवड होती. संत दासगणू महाराजांची ांनी स्वतःच्या घरी व दुसऱ्यांच्या घरीही कीर्तने करविली. त्यांची कीर्तने साई क्तीरसाने ओथंबलेली असत. ते कीर्तनाच्या द्वारे खूप साई-प्रचार करीत असत. रिणाम असा झाला की, कीर्तन ऐकून खूप लोक साईभक्त झाले.

एका रामनवमीला त्यांच्या पुण्याच्या घरी, दुपारी १२ वाजता बाबा प्रत्यक्षच ाऊन आले व शिर्डीस काकांना सांगितले की, मी तुझ्या घरी जाऊन आलो. पण राला कुलूप होते. घरातील सर्व मंडळी राम-जन्मोत्सवा निमित्त मंदिरात गेली ोती.

कै. कृष्ण जागेश्वर भीष्म व काका महाजनी यांनी प्रथम राम-नवमी उत्सव शिर्डीस सुरू केला. त्यांनी बाबांची आज्ञा घेऊन पुढाकार घेतला. बाबांनी विचारले

की,कोणाच्या हुकमाने तुम्ही उत्सव सुरु केला,तेव्हा काका म्हणाले, तुमच्याच हुकमा
हे ऐकताच बाबांनी दोन हार आणविले. एक स्वतःच्या हाताने काकांच्या गळ्या
घातला व दुसरा भीष्म यांच्यासाठी दिला. बाबा म्हणाले,गळ्यात हार असल्याशिवा
कीर्तन कसे होईल? काकांना दासगणू महाराजांचे जन्माख्यान पाठ होते. ते म्हणाले
आता तर आपण कीर्तन करुं, पुढल्या वर्षी आणखी कोणी पाहू. अशा रितीने सुंठव
करुन हा उत्सव दुसऱ्या दिवशी गोपाळकाल्यासह व्यवस्थित पार पडला. सुदैवा
तेव्हापासून दरवर्षी आजतागायत हा उत्सव शिर्डीत चालू आहे.

काकांना साई-भक्त वाढविण्याचा फार नाद होता. निरनिराळ्या नास्तिक लोकां
ते शिर्डीला नेऊन त्यांना साईभक्त करण्याचा फार नाद होता. त्यांना साईबाबांच
हयातीत तर खूपच अनुभव आले होते. परंतु बाबा समाधिस्थ झाल्यावरही अनुभ
आला. १९३३ मध्ये ते इंदूरला आले होते. मुंबईस परत जाताना शिर्डीस जाऊन
बाबांचे दर्शन घेऊन पुढे जावे,असे त्यांच्या मनात आले. त्याप्रमाणे त्यांचे जावई त्यां
शिर्डीस घेऊन गेले. ते दुसऱ्या दिवशी पुढे जाणार होते. पण बाबांनी स्वप्नात येऊ
त्यांना दर्शन देऊन सांगितले की, तू उद्या जाऊ नको. तुझा काळ वेशीवर टांग
आहे. त्यांच्या आज्ञेप्रमाणे ते एक दिवस थांबून, मग पुढे सुखरुपपणे घरी पोहोच

सर्वांना साईबाबांची माहिती व्हावी, म्हणून त्या काळी जी काही भक्त मंडळी होत
त्यांना विचारुन, सर्व संमतीने असे ठरविले की, साईलीला सर्वांना माहीत व्हाव्या
म्हणून आपण 'साईलीला' नावाचे मासिक काढावे. त्याप्रमाणे १९२३ साली
साईलीलेचा पहिला अंक प्रकाशित झाला. पहिल्या भाग्यवान अंकाचे, पहिले
भाग्यवान संपादक श्री साईनाथांचे लाडके भक्त काकासाहेब महाजनी हे होते. त्या
अंकाच्या द्वारे साईप्रचाराची सुरुवात झाली. साईलीला अंक जर प्रकाशित झाला
नसता, तर सर्व लोकांना कसे कळले असते की, असे एक अंतःर्ज्ञानी, ईश्वरी
अवताराचे संत शिर्डीत उपस्थित झाले आहेत. तेव्हा पासून आजतागायत 'साईलीला'
मासिक अखंड चालू आहे, ही मोठी भाग्याची गोष्ट आहे. महाराष्ट्रात आध्यात्मिक
विषयाला वाहिलेले, संत पुरुषांच्या विचारशलाका भाविक वाचकांसमोर ठेवणारे
खुद्द साईबाबांचे भक्तांना आलेले अनुभव प्रदर्शित करणारे, एकाच विषयाला
संपूर्णपणे वाहिलेले. एवढी प्रदीर्घ वाटचाल केलेले अन्य मासिक नाही, ही मोठी
अभिमानाची व खरी गोष्ट आहे.

कै. महाजनींना तीन कन्या होत्या, पैकी एकच हयात आहे, तिचे नाव सौ. सरोजिनी
मुळये.

काका महाजनी हे चेंबर ऑफ कॉमर्सचे मेंबर होते व पुढे प्रेसिडेंटही झाले होते.
काही वर्षे त्यांनी सूरजी वल्लभदास आणि कंपनीमध्ये भागिदारीत काम केले. त्या
कंपनीत रंगाचा व्यापार चालत असे. त्या कंपनीतर्फे ते, १९२१ व १९२४ साली
इंग्लंडला गेले होते.

नंतर ते धरमसी सॉलिसिटर यांच्या पेढीवर काम पहात असत. त्यांना कायद्याचे
ज्ञान चांगले होते. लोक त्यांना सल्ला विचारण्यासाठी येत असत. पुढे त्यांना पक्षाघात

ला म्हणून ते पुण्याला गेले तेथे त्यांनी बसल्या बसल्या मोत्यांचा व्यापार सुरु केला. डे १९३७ साली ते साई-चरणी विलीन झाले.

# श्री बाबांचा एक अनुभव

– सौ. स्नेहलता बिपीन स्वादीया
बी. ए, बी. एड.
३०७, बी, कमल कुंज,
दत्तमंदिर रोड तिसरा मजला,
मालाड (पूर्व), मुंबई - ४०० ०९७.

**जो गाई वाडे कोडे । माझे चरित्र माझे पवाडे ।**
**तयांच्या मागेपुढे । चोहीकडे मी उभाच ।**

माझे पती मुंबईहून बँकेचे एजंट म्हणून बढतीवर नाशिकला बदली झाले आहेत. यामुळे मी माझ्या सासूबाई व मुलांबरोबर मुंबईत रहाते.

काही दिवसांपूर्वी मला, बडोद्याला माझी आई गंभीर आजारी असल्यामुळे चटकन् ये, असा ट्रंककॉल आला. दुसऱ्या दिवशी सकाळच्या "गुजरात एक्सप्रेस" शिवाय कोणतीही गाडी नव्हती. मी घाईघाईने बोरीवली स्टेशनावर त्या गाडीसाठी गेले. त्यावेळी रिझर्वेशन मिळणे शक्य नव्हते. तरी पण श्रीकृपेने मला अनरिझर्व्हड बोगीत खिडकीजवळची बसायची जागा मिळाली.

प्रवासात वेळ घालवण्यासाठी मी श्री साईलीलाचे मराठी व इंग्रजी अंक घेतले होते. गाडी सुरु झाल्यानंतर मी त्यातील एक अंक वाचायला घेतला. सोयीस्कर पडावे म्हणून खिडकीच्या कोपऱ्यावर माझ्या हाताचा कोपर ठेवून एक पान वाचले व ते पान उलटण्यासाठी खिडकीवर ठेवलेला हात काढला. इतक्यात "धप्प" असा फार मोठा आवाज झाला. डब्यातील सर्व माणसं माझ्या दिशेने रोखून पाहू लागली. तेव्हा माझ्या लक्षात आले की, माझ्या खिडकीचे शटर आपोआप हाताने पान उलटण्यासाठी जेव्हा हाताला मी हलवले, तेवढ्या निमिषार्धात खाली पडले. कल्पना करा, मी जर श्रीसाईलीला मासिक बरोबर वाचायला नेले नसते, तर पान उलटण्यासाठी खिडकीच्या कोपऱ्यात ठेवलेला हात उचललाच नसता व साहजिकच माझा हात कायमचा जायबंदी झाला असता.

या प्रसंगाचा जेव्हा मी विचार करते, त्यावेळी मला श्रींच्या अमर्याद सामर्थ्यांची व सर्व ठिकाणी त्यांचे चिंतन करणाऱ्या भक्तांची काळजी वहाण्याचे ब्रीद आठवते. कारण श्रींनी ह्याविषयी श्री साईसच्चरित्रातच हमी दिली आहे. "मग जो गाई वाडे कोडे। माझे चरित्र माझे पवाडे । तयांच्या मागेपुढे । चौंहीकडे मी उभाच ।"

मलाही त्यांनी माझ्या नकळत श्रीसाईलीला वाचायची प्रेरणा देऊन पान उलटण्याच्या निमित्ताने खिडकीजवळचा हात काढायला लावून तेवढ्या क्षणात एका दुर्घटनेपासून सहज वाचवले होते.

# तुमचे श्री साईबाबंविषयक सामान्य ज्ञान किती आ

(पुढीलपैकी पाच प्रश्नांची उत्तरे बरोबर देता आल्यास तुमचे सामान्य ज्ञान सातांची बरोबर देता आल्यास चांगले व सर्वच्या सर्व बरोबर देता आल्यास समजावे.)

१) जामनेरला नानासाहेब चांदोरकरांच्या घरी उदी व आरती देऊन श्रींनी यांस पाठविले होते.
   अ) शामा, ब) बापूगीर, क) नूलकर, ड) साठे.

२) बाळा शिंप्याचा हिमज्वर काळ्या कुत्र्याला.......... घालून बाबांनी बरा के
   अ) दुधभात, ब) दहीभात, क) भाजीपोळी, ड) मटन-बिर्यानी.

३) कफक्षय झालेला भिमाजी पाटील हा.........चा रहिवासी होता.
   अ) संगमनेर, ब) तळेगाव, क) जुन्नर, ड) पुणे.

४) बाबांचा........ हा लाडका भक्त साठ्यांकडे नोकरीस होता.
   अ) मेघा, ब) भागोजी शिंदे, क) मराठे, ड) सोमदेवजी.

५) श्रीसाईसच्चरित या पोथीत एकूण........ अध्याय आहेत.
   अ) ५०, ब) ५२, क) ५३, ड) ५५.

६) श्री साईपाशी मंत्र देण्यासाठी ........ यांनी धरणे धरले.
   अ) राधाबाई देशमुख, ब) बायजाबाई, क) गोखलेबाई, ड) लक्ष्मीबाई.

७) 'रामदासी भजनी मेळा' हा.......... हून शिरडीस त्याकाळी आला होता.
   अ) अंबरनाथ, ब) बदलापूर, क) कलकत्ता, ड) मद्रास.

८) द्वारकामाईतील पालीला भेटावयास औरंगाबादहून तिची सख्खी...... आ होती.
   अ) आई, ब) बहिण, क) भाची, ड) मावशी.

९) साईंचे अनेकदा दर्शन घेतलेले व आज हयात असलेले वयोवृद्ध संत रामबाबा वर्षांचे आहेत.
   अ) १२२, ब) १३०, क) ९०, ड) १०१.

१०) श्री साईंच्या अनेक आरत्या...... यांनी तयार केलेल्या आहेत.
   अ) मानकर, ब) चांदोरकर, क) भीष्म, ड) डेंगळे.

११) बाबांनी स्वतः....... दळून ते पीठ वेशीवर टाकून महामारी घालविली.
   अ) हरभरा, ब) गहू, क) तांदूळ, ड) ज्वारी.

१२) शिरडी हे क्षेत्र........ नदीच्या काठावर आहे.
   अ) अलकनंदा, ब) बियास, क) नर्मदा, ड) गोदावरी.

— सदानंद चेंदवण

**उत्तरे**

१)–ब, २)–ब, ३)–क, ४)–अ, ५)–क, ६)–अ, ७)–ड, ८)–ब, ९)–अ,
१०)–क, ११)–ब, १२)–ड.

५१व्या पुण्यतिथी निमित्त संस्मरण

# इंदूरचे श्री. माधवनाथ महाराज

**— श्री साईनंद**

मध्यप्रदेशात इंदूर येथे एका श्रेष्ठ सत्पुरुषाचे भव्य व प्रसिद्ध मंदिर आहे. समस्त इंदूर निवासी या मंदिरात वेळोवेळी तिथे होणाऱ्या उत्सव प्रसंगी जातात व या सत् पुरुषाच्या समाधीचे दर्शन घेतात. या सत्पुरुषाचे नाव आहे, श्री. प.पू. माधवनाथ महाराज. इंदूरला असलेल्या त्यांच्या या समाधीमंदिरास 'नाथ मंदिर' या नावाने ओळखले जाते



**इंदूरचे श्री. माधवनाथ महाराज**

श्री. माधवनाथांचे घराणे मूळ पांगरी, जि. नाशिक येथील होय. पण पुढे मराठवाड्यातील रंगाऱ्याचे देवगावी (लासूर रेल्वे स्टेशन, जि. औरंगाबाद) त्यांचे स्थलांतर झाले. त्यांचे उपनाव 'रत्नपारखी' व श्री. मल्हारदादा व सौ. मधुराताई हे त्यांचे मातापिता होत. त्यांचा आचार धर्मनिष्ठ असून श्री. यशवंतराव महाराज देव मामलेदार यांची त्यांचेवर कृपा होती. त्यांनी सौ. मथुराबाईंना सांगितले होते की, तुझ्यापोटी योगी पुरुष जन्माला येईल. हे दांपत्य काशी-प्रयागच्या यात्रेवर असताना चित्रकूट जवळ करवी नावाच्या गावी आले. तिथे मल्हाररावांचे चुलत बंधू राहात असत. यावेळी सौ. मथुराबाई गरोदर होत्या व दिवस भरत आल्याने त्यांना त्यावेळी तिथेच मुक्काम करावा लागला.

चैत्र शुद्ध प्रतिपदा शके १७७९ (२६ मार्च १८५७) गुढीपाडवा या दिवशी सुर्योदयापूर्वी मथुराबाई स्नान करुन तुळशी प्रदक्षिणा करु लागल्या. इतक्यात त्यांना

प्रसूती वेदना सुरु होऊन सूर्योदयकालीच पुत्ररत्नाचा लाभ झाला व बाराव्या दिवशी बारसे करण्यात येऊन मुलाचे नाव "माधव" असे ठेवण्यात आले. पुढे मल्हारदादा, पत्नी व मुलासह पांगरी येथे आले. माधव पाच वर्षाचा असतानाच मल्हारांचे निधन झाले. मथुराबाईनी फार शोक केला. तेव्हा लहानग्या माधवने त्यांच्या मांडीवर बसून आपली दृष्टी डोळ्यावर स्थीर केली व तिला आत्म्याच्या अमरत्वाची जाणीव झाली व दु:ख कमी झाले.

लहानपणापासूनच माधव आपल्या बुद्धीप्रभावाने सर्वांनाच दिपवू लागला. पुढे त्याला शाळेत घालण्यात आले पण त्याचे लक्ष शिक्षणावर नव्हते. शाळेचे निमित्य करुन हा मुलगा गावाबाहेरच्या महादेवाच्या देवळात ध्यान करीत बसे किंवा आपल्या सोबत्यांसह भजनपूजन करण्यात दंग होऊन जाई. पण तो जेव्हा शाळेत जाई तेव्हा कोणत्याही विषयात इतर मुलांच्यापेक्षा बुद्धीची विशेष चमक दाखवी.

वयाच्या ८व्या वर्षी त्याची मुंज करण्यात आली. संध्या ब्रह्मकर्म यात त्याने प्रावीण्य संपादन केले. शाळेकडे त्याचे दुर्लक्ष असल्यामुळे आईला सारखी काळजी वाटे. सटाणे येथे यशवंतराव महाराज देव मामलेदार यांच्या दर्शनास त्या मुलासह गेल्या तेव्हा त्यांनी मुलगा मार्गावर आहे, काही एक काळजी करु नका, असे सांगितले पण त्यास लौकरच करवीस घेऊन येण्यास सांगितले. त्याप्रमाणे त्या गेल्या तेव्हा माधवचे वय १० वर्षांचे होते.

श्री मच्छिंद्रनाथ, गोरक्षनाथ, गहिनीनाथ, निवृत्तीनाथ, श्री ज्ञाननाथ, सत्यामलनाथ, गुप्तनाथ अशा नाथ पंथीयांच्या अनेक शाखा होऊन त्यांचा सर्व भारतात विस्तार झालेला आहे. त्यापैकी एका शाखेतील श्रीगुप्तनाथ ही पूर्वाश्रमीची गंगाबाई नावाची महिला होती. नाथदीक्षा घेऊन ती पुढे योगिनी झाली. चित्रकूट जवळील बालाजी मंदिराच्या तळघरात हिची समाधी असून याच गादीवर या छोट्या माधवनाथाना बसविण्यात आले, ती हकीगत अशी–

चित्रकूटास माधवराव आपल्या मातेसमवेत गेले तेव्हा त्यांचे वय १० वर्षांचे होते. एवढ्या लहान वयात त्यांचे शुद्ध आचरण, ईश्वरावरील असीम निष्ठा, ध्यानविषयक मन:प्रवृत्ती व तरतरीत चेहरा इ. गोष्टी पाहून श्रीमंत पेशव्यांचे नातू भाऊसाहेब जोग भोरशास्त्री, सखाराम बापू दिवाण इ. मंडळींच्या अंत:करणात या मुलाविषयी निरतिशय प्रेम निर्माण झाले व हा मुलगा पुढे महाराजांच्या गादीवर बसल्यास तो लोकांचा उद्धार करील, असा सर्वांचा ग्रह झाला.

चित्रकूट येथे त्यावेळी श्री. विठ्ठलराव महाराज होते, ते समाधिस्थ झाल्यावर श्री विश्वनाथ महाराज हे गृहस्थाश्रमी गृहस्थ नाथ गादीवर आले. पण पाच वर्षांनंतर शके १७६६ मध्ये ते पण समाधिस्थ झाले व पुन्हा गादी रिकामी झाली. वर्षभर गादीवर कुणीच नव्हते. अधिकारी पुरुष नाही म्हणून ती रिकामी होती. पुढे यासाठी पाच मुलांची नावे कागदावर लिहून त्या चिठ्ठ्या नाथांच्या समाधीवर ठेवण्यात आल्या व त्यापैकी एक चिठ्ठी उचलली असता ती माधवरावांच्या नावाची निघाली. तेव्हा चैत्र

शुद्ध प्रतिपदा शके १७८९ रोजी रितसरपणे वाद्यांच्या गजात सन्मान सत्कार करुन माधवरावांना अभिषेक विधीयुक्त करुन गादीवर बसविण्यात आले व त्यांचे नाव "माधवनाथ" ठेवण्यात आले.

अनुग्रह दीक्षेसाठी माधवनाथांना शैलशृंगीने विभूषित करुन तळघरातील गुप्तनाथांच्या समाधीजवळ बसविण्यात आले व दार बंद करण्यात आले. काही तासानंतर 'अल्लख' हा नाथ संप्रदायाचा सांकेतिक शब्द आतून आला व दार उघडण्यात आले. या गुंफेत त्यांना गुप्तनाथांचा अनुग्रह झाला व नवनाथांची गूढ योगशक्ती संपादन करुनच ते बाहेर आले. याचा त्यांच्या आचार विचारावर परिणाम होऊन ते विदेही स्थितीत राहू लागले.

काही दिवसांनी माधवनाथांना विश्वनाथ महाराज यांचे कुटुंब ठकुबाई यांच्या स्वाधीन करुन मथुराबाई आपल्या गावी गेल्या. माधवनाथांची विदेही अवस्थेतील वागणूक पाहून ठकूबाई व इतरांना चिंता वाटू लागली. तेव्हा त्यांचे लग्न करून देण्यात यावे, असा विचार करण्यात आला. माधवनाथांच्या हे लक्षात येताच त्यांनी एके दिवशी गुपचूप करवी सोडली व ते गावोगावी तीर्थाटण व तपश्चर्येसाठी निघून गेले. त्यांनी बद्रीकेदार ते रामेश्वरपर्यंत व बंगालमधील हेलारापट्टनापासून गुजराथेतील गिरनार पर्वतापर्यंत तीर्थ यात्रा केल्या. तसेच त्यांनी सर्व ज्योतिर्लिंगे, सहा पुऱ्या व नवनाथांची तीर्थस्थाने दर्शन करुन 'एकमेवा द्वितीयम' तत्त्वाची प्रचीती घेऊन ते करवीला परत आले.

करवीला परतल्यावर माधवनाथांनी गादीचा व्यवहार पहावयास सुरुवात केली. दानधर्म, यज्ञकर्म तिथे होऊ लागली. सखारामबापू त्यावेळी बालाजी संस्थानचे कारभारी होते पण त्यांनी तेथल्या व्यवहारात बरीच अफरातफर केली व ती उघडकीला आली. शेवटी त्यांनी नाथांच्या पायावर डोके ठेवून क्षमा याचना केली. नाथांनी त्यांना क्षमा केली.

पण पुढे याच सखारामबापूनी पुन्हा कारस्थाने करुन नाथांबद्दल ठकूबाईचे मन कलुषित केले. तेव्हा त्यांनी नाथांना करवी बाहेर जाण्यास सांगितले. नाथांच्या भक्तांना ही गोष्ट आवडली नाही.

पण पडत्या फळाची आज्ञा म्हणून ते तेथून निघाले. ५-६ वर्षे त्यांनी अज्ञातवासात घालविली. भक्तांच्या उद्धाराचे त्यांचे या काळात कार्य चालूच होते. ते काशीं व अमरकंटक येथे गेले, तिथे दोन वर्षे अरण्यवासात घालविली. नंतर इंदूर येथे यशवंतराव महाराज देव मामलेदार होते, त्यांच्या दर्शनास ते गेले. इंदूरचे राजे श्रीमंत तुकोजीराव होळकर यांचेकडे त्यांचा मुक्काम होता. योगायोगाने श्रीनाथ महाद्वाराशी पोचले, तोच देव मामलेदारही त्यांच्या स्वागतासाठी महाद्वारी आले. दोघे कडकडून भेटले. देवमामलेदारांनी नाथांना हाताने धरून त्यांना आपल्या निवासी नेले. तुकोजीरावांशी त्यांचा परिचय करुन दिला. यानंतर मात्र सर्व राजघराणे माधवनाथांचे भक्त बनले. तेथून नाथ पुढे मद्रू व धारला गेले. धरला विभूती देऊन त्यांनी अनेकांचे रोगनिवारण केले. हा चमत्कार बघून डॉ. कीगन यांची श्री नाथांवर

श्रद्धा बसली. नाथांनी त्यांना हातावर हात घासून त्याकडे पहाण्यास सांगितले, तेव्हा त्यांच्या हातावर त्यांची प्रतिमा दिसली. हीच साधना करण्यास त्यांनी त्यास सांगितले.

यानंतर नाथ खांडवा चाळीसगावकडे गेले. पोहरे गावी घोड्या नाव त्यांनी धारण केले व एका पाटलाकडे शेतराखणीचे काम करु लागले. तिथे पोटापुरते पाटलाने दूध द्यावे असे ठरले. एकेदिवशी नाथ भजनात रंगले असताना एका बैलाने शेतात शिरून गव्हाचे पीक खराब केले. तेव्हा पाटलीणीस राग येऊन तिने त्यांना शिव्या दिल्या. त्यावर नाथ काहीच बोलले नाहीत, शांतच राहिले. पुढे काम सोडून जाताना त्यांनी बाईस सांगितले की, "तुला ५२ मण गहू यंदा मिळेल". आणि आश्चर्य असे की, खरोखरीच तितके पीक झाले, पाटलास फार पश्चात्ताप झाला.

येसगाव येथ संगळ व नगारा वाजवून सुंदर भजने श्रीनाथांनी केली. रोझेगाव येथे भिकमशहा संत जर्जरी बक्षच्या उरुसासाठी आले होते. त्यांची व नाथांची भेट झाली. दोघांनी मिळून कुराणातील ४ कलमांचे पठण केले. येथून नाथ वेरुरला गेले. व तेथोल राममंदिरात त्यांनी काही सुंदर चित्रे काढली. ती अजून पहाता येतात. येथे चतुर्थाश्रमी श्री चिद्‌घनानंद स्वामींची व त्यांची भेटाभेट झाली. त्यांनी नाथांना सांगितले, "तुझी आई तुझी आठवण काढीत आहे तिला जाऊन भेट व अज्ञातवासात राहून लोकोद्धाराचे कार्य कर." नाशिक जवळील सप्तशृंगी वनात त्यांनी काही दिवस तपश्चर्या केली व ते देवगाव येथे आपल्या मातेस भेटण्यास गेले. मातापुत्रांची भेट झाल्याने मातेला अत्यानंद झाला. "आता मला सोडून कुठे जाऊ नकोस" असे तिने सांगितल्यावर ते तिथेच राहिले. मातेचे सहा महिन्यातच निधन झाले. योगीपुत्राचे सहवासात मरणाचे भाग्य त्या मातेला लाभले.

इ. सन १८९६ म्हणजे वयाच्या ३८व्या वर्षापासून माधवनाथांनी प्रगटपणे धर्म प्रसाराचे व लोकोद्धाराचे कार्य सुरु केले. या काळात जयपूर, चित्रकूट, काशी, नागपूर, खानदेश, मुंबई, पुणे कारवारपर्यंत त्यांनी संचार केला व भाविक जनतेला मार्गदर्शन केले. चित्तशुद्धीपासून आरंभ करुन प्रत्येकाला त्याच्या पात्रतेनुसार जप व योगादीसाधनांचा ते उपदेश करीत.

पुढे श्री माधवनाथ महाराज संचार करीत करीत हिंगणघाट (जि. वर्धा) येथे आले असता शके १८५८ इ.स. १९३६च्या नाथषष्ठीला म्हणजे फाल्गुन वद्य षष्ठीला त्यांनी देह ठेवला. पुढे त्यांच्या आज्ञेप्रमाणे इंदूर येथे त्यांची समाधी बांधण्यात आली. त्यांचे कलेवर मोटारीने इंदूरास नेऊन तेथे मोठ्या थाटामाटाने व शास्त्रोक्त रितीने समाधीचे कार्य संपन्न करण्यात आले. या स्थानी भव्य नाथ मंदिर बांधण्यात आले असून ते आज भाविकांचे व श्री नाथ शिष्यांचे पवित्र क्षेत्र बनले आहे. नाथांनी आपली परंपरा चालविण्यासाठी आपल्या शिष्यांपैकी कोणत्याही शिष्याला गादीवर बसविले नाही. चैत्रशुद्ध प्रतिपदेला नाथ जयंती, फाल्गुन वद्य षष्ठीला पुण्यतिथी व गुरुपौर्णिमा असे तीन उत्सव वर्षाकाठी इंदूर येथील श्रीनाथ मंदिरात मोठ्या प्रमाणावर साजरे होतात व भक्तांचा प्रचंड मेळावा तिथे या काळात जमतो. श्री माधवनाथ महाराजांच्या यंदाच्या ५१व्या पुण्यतिथी दिनी त्यांना कोटी कोटी प्रणाम.

# श्री राम चरितमानस

– सौ. कुसुमताई जोग
'योजना' टिळक नगर
आंग्रे वाडी , मुंबई–४.

श्री राम चरित मानसाच्या सुंदर काण्डातील तेराव्या दोह्याच्या खालच्या चौपाया आहेत ह्या.

"हरिजन जानि प्रीति अति गाढी"

"सजल नयन फुलकावलि बाढ़ी"

सीतेला हरिभक्त कळल्यावर तिच्या अंगावर रोमांच उभे राहिले व डोळ्यांना पाणी आले. इथे हरी शब्द मुद्दाम घातला आहे, राम म्हटले नाही. हरी व राम एकच हे दर्शविले आहे. हा गूढार्थ आहे.

"बूडत बिरह जलधि हनुमाना"

भयअु तात मोकहुँ जलजाना"

भावार्थ हा की, मी विरह रूपी समुद्रात बुडत होते. तू मला नावाडी मिळालास. इथे हनुमंताला तात म्हटले आहे. सीतामाईनी त्यांना मुलगा मानले! किती जवळचे नाते जोडले पहा!

त्या म्हणतात,कोमल अंत:करणाचे रघुपति निष्ठुर कां झाले? काय कारणा करिता ही निष्ठुरता धरली? रघुपती एवढ्याचसाठी म्हटले की, रघुकुलाचे पालन करणारे ते आहेत, मी पण त्याच कुळातील असून असे निष्ठुर का झाले? हे सांगायचे आहे. सेवकांना सुख देण्याचे व्रत असताना माझी कधी आठवण करतात कारे? ती श्याम मृदुमूर्ती मी डोळ्यांनी कधी पाहीन, डोळे कधी तृप्त होतील? तेव्हा सीतेच्या डोळ्यांना पाणी आले. तोंडातून शब्द निघेना. अत्यंत विरहाकूल सीता पाहून, अत्यंत नम्रपणाने व मृदू शब्दाने ते व त्यांचे बंधु कुशल आहेत व पुढे म्हणतात, तव दु:खीसुकृपा निकेतान्हे महत्वाचे आहे. कृपा निकेत तुझ्या दु:खाने दु:खी झाले आहेत. असे म्हणून हनुमंत गहिवरले, ।डोळ्यांना पाणी आले. "कृपानिकेत" म्हटल्यावर हनुमंताची अशी दशा झाली, त्याचे कारण त्यांना तो अनुभव होता म्हणून.

"तत्वप्रेमकर मम अरुतोरा"

"जानत प्रिया अेकुमनमोरा"


हा भगवंताचा संदेश ऐकून जानकी प्रेममग्न झाली, आणि देहाची शुद्ध हरपली ! आता हनुमंत म्हणतात, रामचंद्रांचे श्रेष्ठत्व मनात आणा व माझे ऐका, घाबरु नका. रामचंद्राच्या बाणरुपी अग्नीत हे राक्षस पतंगासारखे जळून जातील, ते मेलेलेच आहेत, असे धरुन धीर धरा. रामचंद्रांना आधीच शोध लागला असता तर विलंब केला नसता. प्रभूंना सर्व ठाऊक होतेच, पण ही लीला तुमच्या आमच्यासाठी केली.

"गाइ गाइ भवनिधि तरई"

हनुमंत म्हणतात, आई, मी तुम्हाला आताच नेले असते, पण रामाची शपथ मला तसे करण्याची आज्ञा नाही. थोडा धीर धरा, वानरसेना घेऊन प्रभू येतील व राक्षसांचा संहार करून आपल्याला घेऊन जातील. त्यांच्या यशाचे गान नारदादी त्रैलोक्यात करतील.

जानकी म्हणते, हे तात! तुझ्याचसारखे सर्व कपी आहेत कारे? राक्षस फारच बलाढ्य आहेत, माझ्या मनात परम संदेह येतो, साधी शंका नव्हती, फार मोठी शंका होती, हे म्हटल्यावर हनुमंतांनी–

"कनक भूधरा कार सरीरा"
"समवर भयंकर अति बलबीरा"



**प्रभु रामचंद्र**

सोन्याचा पर्वता एवढा देह केला. अति बलाढ्य भयंकर रुप धारण केले. ते पाहून सीतेच्या मनाला विश्वास वाटला. हा खरंच बलाढ्य आहे. पुन्हा हनुमंतांनी लहान रुप धारण केले. हनुमंतांना सर्व सिद्धी प्राप्त होत्या. रावणाच्या महालात गेले तेव्हा,

"मसकसमान रुप कपिधरी"

म्हणजे माशीसारखे रुप घेतले. बुद्धिमतांवरिष्ठम् हेच खरे.

हनुमंत म्हणतात,

"प्रभुप्रतापते गरुडहि
खाई परम लघुब्याल"

हे ऐकून सीतेला आनंद झाला. भक्ति, प्रताप, तेज, बल हे सर्व त्या वाणीत होते. सीतेने रामप्रिय जाणून आशीर्वाद दिला. तू बलवान व शीलनिधि होशील।

"अजरअमर गुननिधि सुत होहू"
"कर हुँ बहुत रघुनायक छोहू"

प्रभु कृपा करतील, हे ऐकून हनुमंत प्रेममग्न झाले.सीतेच्या पायावर डोके ठेवून वारंवार नमस्कार केला व हात जोडून म्हणतात, आई, आपल्या अमोघ आशीर्वादाने मी कृतकृत्य झालो. आई,मला फार भूक लागली आहे. झाडावरची मधुरफळे लागलेली मी पाहिली. सीता म्हणते, महापराक्रमी राक्षस अरण्याची राखण करतात. हनुमंत म्हणतात, तुम्हाला जर मनापासून सूख होत असेल तर मला त्यांचे भय नाही. इथे "मनमाहीं" म्हटले. का, तर खरंच मनापासून आवडत असेल तर सांगा, संकोचाने नको.

"देखिबुद्धिबल निपुन कपि कहेहु
जानकी जाहू"
"रघुपति चरन हृदयँ धरितात मधुर फल खाहूँ"

सीतेला हनुमंत बुद्धिबल निपून वाटले. तरी मुलाचे नाते जोडल्याने राक्षसांशी गाठ आहे. काय करतील कोण जाणे, आपण सुद्धा शिकलासवरलेला मुलगा गावाला जायला लागला की, जपून जा म्हणतो. कारण आईच्या अंत:करणाला धाकधूक वाटते. तसेच सीतेचे झाले. तिथे खूप शूरवीर राखणदार होते. हनुमंतांनी काही मारले, काही ओरडत गेले. त्यांनी रावणाला सांगितले की, एक भयंकर कपि आला आहे, त्याने अशोक वनाचा विध्वंस केला आहे. तो फळे खातो व वृक्ष उपटून टाकतो. आणि रक्षकांना बेदम मार देऊन जमिनीवर लोळवतो. रावणाने ते ऐकून पुष्कळ शूर वीर पाठवले. त्यांना पाहून हनुमंतांनी गर्जना केली. सर्वांचा संहार केला. जे अर्धवट मेलेले होते,ते ओरडत गेले. मग रावणाने आपल्या अश्वया नावाच्या मुलाला पाठवले. त्याने बरोबर अपार सैन्य नेले होते. अश्वयाला आलेला पाहून हनुमंतांनी हातात वृक्ष अुपटून घेऊन, त्याला त्या वृक्षाने मारुन गर्जना केली,

"कछु मारेसि कछु मर्देसि कछुमिलसेसि धरि धूरी"
"कछुयुनि जाइ पुकारे प्रभुमर्कट बल भूरि"

म्हणजे काही मर्दुन काही धुळीत लोळवले. काही ओरडत गेले की, हे मर्कट फार बलवान आहे. मुलगा मेलेला ऐकून रावण रागावला, आणि बलाढ्य मेघनादाला पाठवले. आणि सांगितले की, त्याला मारु नको, बांधून आण. मला कुठला कपि आहे ते पहावयाचे आहे. आता अतुलित योद्धा इंदजित निघाला. भावाला ठार केले,हे ऐकून तो फार रागावला. हनुमंतानी जाणले की, मोठ्ठा योद्धा आला आहे. दांत कडकड खाऊन गर्जना केली व धावले. एक विशाल वृक्ष उपटला,इंद्रजितावर टाकला. त्याला

रथातून खाली ओढला. त्याच्या बरोबर जे बलाढ्य योद्धे होते,त्यांना हनुमंतांनी कुदलू काढले. म्हणजे लाथा बुक्क्यांनी मारले. त्यांचा निःपात करुन हे दोघे हत्तीच जण एकमेकाला भिडले. हनुमंत बुक्क्या मारायचे व झाडावर चढून जायचे. इंद्रजिताल एक क्षण मूर्छा आली. तो पुन्हा ऊठला व त्याने माया केली. परंतु हनुमंत जिंकले जाइनात. इथे वायू म्हटले नाही, प्रभुजन म्हटले. म्हणजे वाऱ्याप्रमाणे गती.

"ब्रह्मअस्त्रतेंहि साँधा कपिमन कीन्हबिचारे"

"जौंन ब्रह्मसर मानअुँ महिमा मिटइअपार"

इंद्रजिताने ब्रह्मास्त्र सोडले. हनुमंतांनी विचार केला की, जर मी ब्रह्मास्त्राला मानले नाही तर त्याचा अपार महिमा नाहीसा होईल. ब्रह्मास्त्राने हनुमंत मुर्छित झाले. इंद्रजित त्यांना नागणाशाने बांधून घेऊन गेला. शंकर पार्वतीला म्हणतात,

"जासुनाम जपि नहुभवानी"

"भवबंधन काटहिं नर ग्यानी"

हे भवानी,ज्याच्या नामाच्या जपाने ज्ञान्यांचे भवबंधन तुटून जाते. त्यांचा दूत कधी बांधला जाईल का? पण प्रभूच्या कामासाठी बांधला गेला. हनुमंतांना बांधले,हे ऐकून राक्षस धावले. आणि कुतुहलाने सर्व सभेत आले. आता रावणाची सभा हुनमंतांना कशी दिसली.

"कहिन जाइकछु अति प्रभुताई"

देव, दिशांचे मालक अत्यंत नम्रपणाने हात जोडून उभे होते. रावणाकडे सर्व घाबरुन पहात होते. हा प्रताप पाहून हनुमंतांना मुळीच शंका आली नाही. ज्या प्रमाणे सर्पांच्या जवळ गरुडाला भीती वाटत नाही त्याप्रमाणे.

"कपिहिबिलोकि दसाननबिहसाकरि दुर्बाद"

"सुतबध सुरति कीन्हि पुनीअुपजाहृदय बिशाद"

हनुमंतांना पाहून रावण हसला व दुर्वचन बोलायला लागला, मुलाच्या मृत्युचे स्मरण होऊन मन दुःखी झाले होते. इथे २० दोहे पूर्ण होतात. असे आहे हनुमंतांचे चरित्र.

"रामरुपी अंतरात्मा दर्शने दोष नासती," असे समर्थांनी म्हटले आहे. रामभक्त कसा असावा–बुद्धिमान, चारित्र्यसंपन्न, स्वामिभक्त,दयाळू, प्राण गेला तरी धन्याची अवज्ञा करणार नाही, हा बाणा वगैरे वगैरे. मुलाप्रमाणे दासावर एक प्रभूच प्रेम करतात! रामदास होणे सोपे नाही. ते कसोटी लावून घेतात, लवकर प्रसन्न होत नाहीत. तन, मन, धन सर्व द्यायला हवे आणि

"सबक ममता ताग बटोरी"

आणि सर्वांच्या वरचे ममत्व काढून,त्याची दोरी वळून त्यांचे चरण बांधले पाहिजेत. हे वर्म.

ही सर्व लीला भगवंतानी कशाकरता केली तर, "गाइगाईभवनिधितरही" ह्या लीला गावून स्वतःचा उद्धार करून घ्यावा, त्यांच्याच लाला लिहाव्यात, ही त्यांचीच

इच्छा. हिंदी भाषेमुळे मराठी लोक रामायणाकडे पहात नाहीत, ते त्यांनी पहावे. खरोखर माणसाचे वेड ज्यांच्या कृपेने ज्यांना लागले, ती माणसे धन्य.

सर्वांनी रामनामाचा खूप जप करावा. आपले जे उपास्य दैवत असेल त्याचा पण चालेल. हनुमंत प्रसन्न होतील. जपासारखे साधन नाही. उगीच गप्पात वेळ घालवू नये. जर वेळ सापडला की, जप करावा, व मनुष्यजन्माचे सार्थक करावे. हा जन्म पुन्हा मिळणे दुर्लभ.

"सियावर रामचंद्र की जय"

## लेखक - कवींस निवेदन

**'श्री साईलीला' मासिकाकरिता साहित्य पाठविताना लेखक - कवींनी पुढील गोष्टींची दक्षता घेणे आवश्यक आहे.**

*** अंतर्देशीय पत्रावर, पोस्टकार्डवर लेखन करू नये.**

***आमच्याकडे आलेल्या कवितांचे प्रमाण खूपच असल्याने, पुढील सूचना मिळेपर्यंत, कृपया, कविता पाठवू नयेत.**

*** सुवाच्च अक्षरात, कागदाच्या डाव्या बाजूस भरपूर समास सोडून, दोन ओळींच्या मध्ये पुरेशी मोकळी जागा ठेवून लिखाण असावे, ते पाठपोठ असू नये, शक्यतो टंकलिखित असावे, लेखनासाठी वापरात येणारा कागद जीर्ण-विजीर्ण, टाकाऊ असू नये.**

*** हयात असलेल्या संतांविषयीचे लेख, सामान्य दर्जाचे अनुभव पाठवू नयेत.**

*** अभ्यासपूर्ण, तर्कशुध्द, मीमांसक व वैचारिक स्वरूपाच्या लेखांना प्राधान्य दिले जाईल.**

**— का. सं.**

## श्री शिरडीतील रामनवमी उत्सव

प्रतिवर्षाप्रमाणे श्री रामनवमी उत्सव शुक्रवार, ता. २५-३-१९८८ ते रविवार, ता. २७-३-१९८८ असे तीन दिवस शिरडीस साजरा होईल, असे कार्यकारी अधिकारी श्री. रा. द. बन्ने हे कळवितात.

पुण्यतिथी निमित्त खास लेख

# श्री सद्गुरु किसनगिरीबाबा व श्रीक्षेत्र देवगड

– साईनंद

कोकणामध्ये देवगड बंदर म्हणून प्रसिद्ध आहे तर देशावरील देवगड हे तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्धीला येत आहे. प्रवरा नदीच्या काठावर हे देशावरील क्षेत्र आहे. संत ज्ञानेश्वरांनी नेवासे येथे श्री ज्ञानेश्वरी लिहिली, त्या नेवाश्यापासून अवघ्या १४ कि. मि. अंतरावर मुरमे गावानजीक उंच अशा ठिकाणावर हे क्षेत्र देवगड आज वसलेले आहे. या क्षेत्राचा विधाता, कर्ता करविता आणि दुःखहर्ता एक महान तपस्वी बालसंन्यासी श्री किसनगिरीबाबा हे होत. हे श्री किसनगिरीबाबा महाराष्ट्रातील फार थोड्या मंडळींना ज्ञात आहेत, होते.



**श्री सद्गुरु किसनगिरी बाबा**

दिनांक १३ सप्टेंबर १९०७ रोजी प्रवरा नदीच्या बामांगी वसलेल्या गोधे गावी रामभक्त शबरी समाजातील एका कुटुंबात राहीबाई नावाच्या मातेच्या पोटी एका सावळ्या पण तेजस्वी अंगकांतीच्या बाळाने जन्म घेतला. माता राहीबाई व पिता मारुती यांनी आवडीने बाळाचे नाव "किसन" असे ठेवले. हाच किसन पुढे आपल्या गुणांनी, वाणीने, वर्तनाने, परमात्म्याच्या भक्तीने 'किसनगिरी महाराज' म्हणून ओळखले जाऊ लागले.

वयाच्या पाचव्या वर्षापासून छोटा किसन गावातील पाटील मंडळींची गुरे राखणीची कामे करु लागला. तेव्हापासूनच या मुलाच्या स्वभावात, वागण्यात विलक्षण चमत्कारिकपणा दिसू लागला. जन्मदात्या आईशिवाय दुसऱ्या कोणत्याही स्त्रीच्या हातचे अन्न घ्यायचे नाही आणि पुढे पुढे तर फक्त स्वतःच्या हातानेच तयार

केलेले अन्न खाण्याचा नेम त्यांनी ठेवला. पुढे तर आपल्या मोठ्या व लहान बंधूबरोबर प्रवरेच्या पाण्यातील मासे धरण्यासाठी तो जाऊ लागला, पण तिथे त्यांना मदत करण्याऐवजी बंधूंनी धरलेल्या माशांना पुन्हा पाण्यात सोडून देत असे. पुढे तर हा तऱ्हेवाईकपणा खूपच वाढला. वयाच्या आठव्या वर्षापासून तो शंकर भक्तीतच गर्क राहात असे. दिवसभर शेतात कष्ट करायचे व रात्री प्रवरेच्या पात्रात वाळूची पिंड करुन तिची सेवा करायची, स्नाने करायची पिंडीची पूजा अर्चा करायची,असा त्याचा कार्यक्रम चाले. लोकांना वाटायचे हा मुलगा वेडा आहे, कुणाला वाटायचे हा मुलगा मांत्रिक आहे. अशा प्रकारे १२ वर्षे शिवपिंडीची पूजा अर्चा करण्यात या मुलाचा काळ गेला. या काळात गावातील एक उंबराचे झाड पार वाळून गेले होते. पण या शिवभक्त किसनने दररोज एका गंगेचे पाणी या झाडाला घालून त्यास पूर्ववत सचेतन केले. अशाप्रकारे अनेक घटना या मुलाकडून होत गेल्या.

ज्या पाटलाकडे किसन काम करीत असे,त्याने एक दिवस पैज लावली की,एक महिना फक्त लिंबाचा पाला खाऊन रहावयाचे. त्याप्रमाणे किसनने एक महिना लिंबाच्या पाल्यावर काढला पण याचा परिणाम उलटा झाला. किसनची प्रकृती खालावण्याऐवजी साक्षात् मारुतीरायाचे तेज पाटलांना व इतरांना दिसू लागले. तेव्हापासून लोकांनी किसनला कामावर ठेवण्याचे बंद केले.

कामे मिळेनाशी झाल्यावर किसननी चारीधाम यात्रा करण्याचा निश्चय केला व तो वडिलांना बोलून दाखविला व त्यांच्या निर्णयाची वाट न पाहाता मार्ग धरला. वडिलांनी स्वतःजवळ असलेले फक्त चार रुपये जबरदस्तीने मुलाजवळ दिले,ते घेऊन त्याने गाव सोडले व बरोबर १५ दिवसांनी तो गावी परतला व चारी धामे केल्याचे सांगू लागले. लोकांनी त्याला वेड्यात काढले. गावातील काही म्हातारी जाणकार मंडळी आली. त्यांनी प्रत्येक धामाच्या काही खुणा व माहिती विचारली. ती बरोबर सांगून किसनने सर्वांसमक्ष वडिलांनी दिलेले चार रु. परत केले. तेव्हा सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला. या घटनेपासून लोक किसन म्हणण्याऐवजी "किसनबाबा" म्हणू लागले. आता त्यांचे वय २० वर्षांचे झाले होते. ते माधुकरी मागत गावात हिंडत. ती भरपूर त्यांना मिळू लागली. जनावरांना, पक्षी इ. ना ते ती टाकत. ते ज्या गावात माधुकरीस जात तिथे शुभ घडायचे. त्यांच्या आशीर्वादाने लोकांचे आजार बरे होऊ लागले. ते हमेशा प्रवरेच्या तीरावर असलेल्या एका औदुंबराचे खाली बसून दत्तप्रभूंची सेवा करीत. पुढे याच जागी दत्तप्रभूंचे सुंदर मंदिर बांधण्याचा मानस त्यांनी भक्तगणांना बोलून दाखविला. त्याकाळी त्यांनी नेवासे येथील संतपुरुष श्री नाथ बाबांचे शिष्यत्व पत्करले होते. पुढे गुरुच्या आशीर्वादाने व भक्तांच्या सहकार्याने त्यांनी शून्यातून सृष्टी उभारली, तीच आज देवगड श्री क्षेत्र म्हणून ओळखली जाते.

जस जसे क्षेत्रस्थान उभारले जाऊ लागले तस तशी श्री किसन बाबांची सुकिर्ती सर्वत्र पसरु लागली. ते शिकले सवरलेले नव्हते. पैशाचा हिशोब त्यांनी कधीच ठेवला नाही. कामगारांचे कामाचे दिवस विचारावयाचे व त्यांना कामाचा मोबदला द्यायचा. या देवगड क्षेत्रीचे जे बांधकाम आहे,ते सर्वच्या सर्व श्री किसनगिरी बाबांच्या इच्छेप्रमाणे

झालेले आहे व अजूनही अपूर्ण राहिलेले बांधकाम त्यांच्याच इच्छेप्रमाणे पूर्ण होत आहे. देवगड हे क्षेत्र कुणाही इंजिनियर किंवा आर्किटेक्टने साकार केलेले नाही. बाबांच्या कल्पनाविश्वातून निर्माण झालेला तो भूस्वर्ग आहे. कारण स्वर्गीय आनंद या ठिकाणच्या वातावरणात भरलेला आहे. निर्जन ओसाड जागेचे त्यांनी एक सुंदर तीर्थस्थान बनविलेले आहे. हे प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय समजायचे नाही.

वृद्धापकाळामुळे श्री बाबा थकत चालले होते. त्यांना आपल्या शरीरप्रकृतीची चांगलीच कल्पना आली होती. त्यांनी १९७५ साली श्री संत आदिशक्ती मुक्ताबाई यांचे श्रीक्षेत्र महत्त नगर (मेहूण) येथील संस्थानचे प.पू. ब्रह्म निष्ठ गुरुवर्य श्री श्रीराम महाराज यांचे विद्यार्थी श्री. भास्करगिरी महाराज यांचेवर येथली सर्व ती जबाबदारी सोपविली व दि. ६ मार्च १९८३ रोजी वयाच्या ७३व्या वर्षी वैकुंठगमन केले श्री किसन गुरूंनी असंख्य लोकांना भक्तीमार्गाला लावून त्यांचे दुःख निवारण केलेले आहे. अनेकांना त्यांनी अडीअडचणींतून मुक्त करुन सुखाचे दिवस दाखविलेले आहेत. त्यांनी अंगारा-धुपारा, मंत्र-तंत्र इ.चा वापर कधीच केलेला नाही. भाव ठेवा, शुद्ध आचरण ठेवा, घरात विटाळ सांभाळा हाच त्यांचा उपदेश असे. आज देवगड येथील सर्व ती जबाबदारी श्री भास्करगिरी महाराज यांच्यावर असून ती ते तंतोतंत पाळीत आहेत.

देवाचे भूनंदन श्री क्षेत्र देवगड येथील मुख्य मंदिर श्री दत्त प्रभूंचे आहे. सर्व बांधकाम संगमरवरी असून महाराष्ट्रातील संपूर्ण दगडी बांधकाम असलेले हे मंदिर होय. कलेचा एक उत्कृष्ट नमुना म्हणून या मंदिराकडे बोट दाखवावयास हवे. मंदिराचे मागे प्रवरेच्या काठावर श्री शनी महाराज व श्री मारुती यांची मंदिरे आहेत. तसेच एक भव्य पाकशाळा आहे. तिथे स्वयंपाकघर व भोजनासाठी दिवाणखाना आहे. शनी मंदिराजवळच श्री मच्छिंदनाथ व श्री गोरखनाथ यांना दिलेली जागा आहे. मुनीवर्य नारद यांचे स्थान पाकशाळेच्या मागे आहे. मंदिराचे उत्तरेस कोकणी मार्कंडेयाचे स्थान आहे. दत्त मंदिराचे डाव्या बाजूस दक्षिणेकडे द्वार असलेले श्री पंचमुखी सिद्धेश्वर मंदिर आहे व मागील बाजूस मातापार्वती देवीची स्थापना केलेली आहे उजवीकडील गाभाऱ्यात गणेशाची व डावीकडील गाभाऱ्यात श्रीकार्तिक स्वामींची मूर्ती स्थापन केलेली आहे.

दत्तमंदिराचे उजवे बाजूस श्री सिद्धेश्वर मंदिराचे समोर श्री समर्थ किसनगिरी बाबांचे समाधी मंदिर आहे. गाभाऱ्यात उंच संगमरवरी सिंहासनावर संगमरवरी औदुंबराचे छायेत प.पू. बाबांची मूर्ती विराजमान आहे. या मंदिराच्या खाली बाबांची समाधी असून दर्शनासाठी भुयारी मार्ग आहे. दत्तमंदिराचे दक्षिणेला बाबांचे निवासस्थान-गुरुस्थान असून बाबांनी वापरलेल्या सर्व वस्तू भक्त दर्शनार्थ ठेवलेल्या आहेत. भास्करगिरी महाराजही याच ठिकाणी बसून जनतेच्या अडीअडचणींचे निवारण करतात. संपूर्ण मंदिरासमोर भव्य महाद्वार आहे. असे हे देवगड क्षेत्र निसर्गसुंदर व नयनरम्य असे आहे. प्रत्येक दत्तभक्ताने या ठिकाणी अवश्य भेट द्यावी असे आवर्जून सांगावेसे वाटते.

# श्री. साईबाबांचा अनुग्रह

**शालिनी देसाई**
एम. एससी., एम. फिल.
राजस, ना. सी. फडके मार्ग, अंधेरी.

श्री सद्‌गुरुंची कृपा कोणावर,कशी,कोणत्या वेळी,नेमकी कशी होते याचे अनुमान काढणे मोठे कठीण असते. साईलीला वाचकांनी, 'तुमच्यावर गुरुची कृपा कशी झाली' यावर पत्रे धाडली. त्यांना उत्तरे लिहिणे कठिण होते. प्रथम अपत्य मुलगा झाल्याचा आनंद त्याच्या आईवडिलांना विचारले,तर ते माता पिता काय सांगतील? फार तर तुलनात्मक शब्दांत सांगू-शकतील.जसे सामान्य पास होणाऱ्या विद्यार्थ्याला अचानक सेन्टरला फर्स्ट आल्याचे कळले,तर जे वाटेल तसेच काहीसे! याहुनही वेगळा आणि आगळा गुरुदेवांचा परमोच्च दिव्य आनंदाचा अनुभव ही शब्दांकित करण्याची गोष्टच नव्हे!तरीदेखील मोठमोठ्या संत महंत महोदयांनी श्री. तुकाराम महाराज, ज्ञानदेव माऊली, कबीर संत, मीरादेवी यांनी मोठ्या खुबीने ईशप्रेमी भक्तगणांसाठी चतुरतेने बहारदार शब्दरचना करुन हळूच दाखवले "हेच ते." समजणाऱ्याला समजून जाते आणि त्या आनंदात तो धुंद राहतो. देवी सीतेला स्वयंवराचे वेळी सख्यांनी विचारले, "येथे जमलेल्या राजकुमारांत तुझ्या हृदयातले प्रभू कोण ग जानकी?" ती चूप राहिली. तशी तिच्या एका चतुर सखीने प्रत्येक राजाकडे बोट दाखवून विचारले,"हा काय तो मैथिली?" आणि सीतेने प्रत्येक वेळी 'नाही' म्हटले पण जेव्हा प्रभू श्री रामचन्द्रांकडे सखीची नजर रोखली गेली, तेव्हा सीता स्तब्ध झाली, "हेच ते" म्हणायचं भानही तिला उरलं नाही. शुध्द आनंदाच्या कैवल्य लहरींनी ती भारावून गेली आणि सखी उमजली "तोच हा!" जनकपुत्रीच्या हृदयसिंहासनावर विराजमान झालेलं "हेच ते" दैवत. आणि अतीव उच्च दिव्य शक्तिच्या दर्शनाने सखीदेखील एक क्षण मुग्ध झाली. तिचा बिचारीचा तेव्हढाच आनंद,पण तिला जन्मजन्माची कृतकृत्यता वाटत होती. कारण सीतादेवीच्या आनंदाच्या केवळ पडसादावरच ती खूष होती. तसेच आपणा सर्वांचेच आहे. आपणाला सन्तवाङ्मय आवडण्याचं कारणही तसंच काहीसं आहे. सात्विक भक्ति,प्रेम ते वाङ्मय वाचत असताना उचंबळून येतं आणि आपलाच आपणाला चित्स्वरुपाच्या स्पर्शाचा अनुभव येऊ लागतो. साईलीला वाचकांनी अनुपम साईभक्ति पुन्हा पुन्हा खुणावते आणि मग मला दिसू लागतात ...."मज लागला तुमचा लोलो" म्हणत अगदी सहजतेने कुणाचे लाडाने गालगुच्चे घेऊन, तर कुणाला विष्णुसहस्त्रनाम देऊन, तर कुणाला हळुवारपणे गोंजारुन कळत नकळत अनुग्रह करणारे ते अतीव करुणाघन सद्‌गुरु श्री साई आणि त्यांच्या चरित्रातील प्रेमाच्या खुणा आणि मग म्हणावेसे वाटते "हे पहा ते"

लाजाळूच्या क्षणभर ताठ असणाऱ्या रोपाला सहज स्पर्श होताच हजारो स्पंदनाने पुलकीत होऊन ते रोपटं जसं निमिषार्धात लवलीन व्हावं, तसं किंचित ज्ञानाच्या

अभिमानाचा ताठरपणा येतो न येतो तोच भक्तीच्या प्रेमरसात ओथंबून वहाणाऱ्या चित्स्पंदनाचा अनुभव देणाऱ्या त्या प्रेमखुणा माझ्यातला "मी"पणा अगदी भुईसपाट करतात. कसा लिहू अनुभव? एवढी मोठी प्रज्ञेची झेप केवळ गरुडपंखी हेमाडपंताचीच किंवा गगनाला गवसणी घालणाऱ्या त्या सर्व थोर ईश्वरनिष्ठ सन्तसंप्रदायाची आणि म्हणूनच अनुभवास आलेलं सम्यग् दर्शन श्रीसाईचरित्राच्या आधारे लिहिले, तर साईप्रेमी वाचकांना उमजणे सोपे जाईल. त्यासाठी स्वानन्द साम्राज्याचा भोग घेणाऱ्या त्या त्यागी, निःस्पृह संतांना सलामी देऊन फक्त दरबारच्या कमानीतून आपण डोकावून पाहू, जेवढं दिसेल त्या ओझरत्या दर्शनाने आपण सारे तृप्त होऊ. याकरिता श्री साईचरित्रातील १९ व्या अध्यायात हेमाडपन्तावर बाबांनी केलेला अनुग्रह पाहत ज्ञानमौक्तिक गोळा करु.

कोणत्याही अध्यात्मिक ग्रंथलेखनाच्या शिरस्त्यानुसार प्रथम श्रीगुरु नमन करुन अगदी पहिल्या ओवीतच हेमाडपन्तानी अद्वैताच्या अत्युच्च कळसावर भरारी मारली. जसे, 'सूक्ष्माहुनि सूक्ष्म अत्यन्त ... वस्तुजात हा साई'॥१॥ अ. १९, सा. च. आणि मग सगुण भक्तिच्या पायाकडे येण्याची इच्छा व्यक्त केली, 'रंगरुपादि आकार काही॥ .... इच्छा ही उदेली॥' आणि त्यानंतरच्या प्रत्येक ओवीत सहस्त्रधारांनी उडणाऱ्या कारंजाप्रमाणे षट्शास्त्रांचे दर्शनच जणू प्रत्ययास येते. २४ व्या ओवीपर्यंत ज्ञानाची महती सांगत असता, भक्तिमार्गाची सहजसुन्दरता कधी येऊन ठेपते ते लक्षातच येत नाही. जणू कोशातून अलगद फुलपाखरुं बाहेर यावं, तसं ज्ञानाला रामफळ आणि भक्तीला सीताफळाची उपमा देवून तुम्हालाच निवड करायला सांगितलंय. 'यथेच्छसि तथा कुरु' सांगणाऱ्या भगवंतांनी आपल्या लाडक्या पार्थाला विराट स्वरुप दाखवून भक्तिच्या प्रेममय खुणा सांगितल्या. त्याप्रमाणेच साईबाबांनी भक्तिलाच प्राधान्य दिलंय अधिक. 'म्हणूनि साई दयाघन ... भक्ति आणि नामस्मरण ।' याचेच विवरण करीत ॥ ३२/१९ सा. च.

कुणा एका म्हातारीने उपदेशासाठी बाबांकडे प्रायोपवेशनचा निग्रह केला असता, तिच्यावर अनुग्रह बाबांनी कसा केला, ही कथा भक्तश्रेष्ठ शामाने बाबांना सांगितली. ती कहाणी हेमाडपंतानी अप्रतिम भक्तिरसाने ओथंबलेल्या शब्दांत ओवीबध्द केली आहे. ओ. ३५ ते ७९/१९ सा. च. त्यात त्यांचे दाटून आलेल्या अष्टविध भक्तिभावाचे दर्शन पाहून कळत नकळत सात्त्विक साईप्रेमी साईभक्तांच्या पापण्यांच्या किनारी ओलावल्यावाचून रहाणार नाहीत आणि तीच गोष्ट जेव्हा बाबांना त्यांनी निवेदन केली ओ. १००/१९ सा. च. त्यावेळची त्यांची स्थिती जणू खडीसाखर विरघळावी तशी. त्यांनी माधवरावांकडून कथा ऐकली. त्यात भक्तिची परमावधीची स्थिती होती आणि जेव्हा ते तीच कथा बाबांना ऐकवत होते, तेव्हा बाबांनी विचारले, 'तुला सार्थकता वाटली का?' तेव्हा हेमाडपंत उद्गारले, 'लाधलो मी निजविश्रांती । ....मार्ग निश्चिती कळला ॥१०३॥ त्यांच्या या उत्तरात 'नष्टो मोहः स्मृति लब्ध्वा।' ही धनंजयाने योगेश्वर भगवंतांना दिलेली प्रतिसादाची खूण आढळते. याला कारण ज्ञानी गुरुंच्या

सान्निध्यात भक्तितून ध्यान होते, ते सद्‌गुरुंचे आणि त्या ध्यानातून स्फुरण होते, सर्वभूतस्थ, निर्गुण, अन्तर्यामी, सत् चित्, आनन्दघन परमात्म्याचे. त्याक्षणी ध्याता, ध्यान, ध्येय हे भान संपून रहाते ते केवळ ज्ञानस्वरुप स्वतःचेच अनादि अनन्त आत्मस्वरूप. हे रसरशीत सौंदर्याने भरलेले वर्णन ओ. १०४ ते ११२/१९,सा. च. साईप्रेमीना क्षितीजाची सुध्दा क्षिती नसलेल्या अमर्याद स्वानंद साम्राज्यात घेऊन जाते. केवळ वर्णनच एवढे सुख देते,तर गुरुचं सान्निध्य किती सुखदायी असेल,याचे दृश्य - 'ही तो प्रत्यक्ष अमृतवृष्टि। पिलिया लाधे स्वानन्द पुष्टि। ऐक्य सृष्टि गुरु शिष्या ।११३/१९ सा. च. या ओवीतच पहावे. पण यासाठी सद्‌गुरु साईसारखे निःस्पृह, त्यागी, योगयोगेश्वर, थोर सन्तविभूति, ज्याला किर्ती,संपत्ति कशाचीही स्पृहा नसते. अशाच ज्ञानी कारण सत्पुरुषांची दिव्य संगति लाभते,तेव्हा ज्ञानाचे स्फुरण प्रगटते, आपले आपणातच. जसे हेमाडपंतांना साई (सद्‌गुरु) साईबाबा लाभले,तद्वत् त्या निर्गुण समाधीस्थ साईबाबांच्या कृपेनेच मलाही सगुण साईचा लाभ झाला आणि शरीराच्या सीमेवर येऊन जेव्हा साईलीला असलेले साईचरित्र वाचू लागले,तसे हजारो इन्द्रधनुष्ये आकाशात उमटावीत किंवा सहस्त्रशीर्षाचा फणीधर पृथ्वीची गोळी करुन हाती देतोय, अशा अगाध, परमोच्च,अतर्क्य,आनन्द स्थितीत प्रवेश होतो. त्यामुळे भक्त रत्न अर्जुन, ज्ञानदेव, एकनाथ, तुकाराम महाराज आणि हेमाडपंत यांच्या अनुभवांचा मागोवा उमजू शकतो. पण त्या थोर थोर सन्त प्रभृतींच्या साहित्य सोनियाचिया खाणीत उतरायलाही धजत नाही मन. त्यांनी त्यांचे अनुभव शब्दांकित केले म्हणण्यापेक्षा, वाग्विलासिनी देवी सरस्वतीने जणू त्यांना निमित्त करुन छेडले आपुल्या वीणेचे झन्कार!

वाद्यघोषांच्या गजरात चालणाऱ्या थोरामोठ्यांच्या मिरवणुकीत कुणा एका बालकानं आपल्या चिमुकल्या दोन हाती टाळी वाजवून मोठ्या प्रेमानं साथ देण्याचा हळूच प्रयत्न करावा,तसं हे लिखाण साईप्रेमी साईलीला वाचकांना सांगू इच्छितेय की, साईभक्तितूनच ज्ञानाचा आनंद उपभोगावा. साईबाबा हेमाडपन्ताना म्हणाले, 'या साखरेवाणी होईल स्थिती । .... होईल तुझे कल्याण चोखड । पुरेल होड अन्तरीची ॥११८/ अ. १९,सा. च. तसे हेमाडपंत बाबांना अभिवादन करुन म्हणाले,मागितले हेचि कृपादान। हेचि पुरे मज आशीर्वचन। संभाळून घ्या मज ॥११९॥ ज्ञानाच्या दिव्य आनंद भोगूनही अत्यंत विनम्र भक्तिने केलेली 'संभाळून घ्या मज' ही करुणामय प्रार्थना मला सर्वात हृदयंगम वाटली. हिमाच्छादित शिखरे चढण्यापेक्षा पायथ्याशी बसूनच ती पहावीत आणि त्या अनुपम सौन्दर्याच्या अवलोकनातच,कृतकृत्यता मानावी, तसे 'क्षणभर थांबावे नव्हे तर बराच वेळ रेंगाळावे' येथे असे वाटते. हा अध्याय येथवर वाचूनही अनुग्रह म्हणजे काय, याची कल्पना वाचकांना आली तरी सार्थ झाले म्हणायचे. शेवटी बाबांच्या पायी लीनपणे या लेखाचं तात्पर्यरुपी काव्यसुमन वाहून लेखणी थांबवते.

अनुग्रहासाठी
नको अट्टाहास ।
साईच देतील
मग निज ध्यास ॥१॥
चित्ती असू द्यावी
हीच एक खूण ।
गुरूच्या लेकराला
नाही उणं दुणं ॥२॥
रामाच्या सेतुला
मोठमोठाल्या शिला
खारीचा वाळुकण
कमी कां लेखला ॥३॥
प्रभूंचा तो स्पर्श
चिरन्तन मनी राही ।
वात्सल्य भक्तिची ती
आजही देते ग्वाही ॥४॥
भक्ति रसापोटी
ज्ञानाचीच खाण ।
गुरू कृपा होता
कशाची रे वाण ॥५॥
अनुभवू जाता
सर्वांभूती साई ।
सांगता संपते
शालिनी देसाई ॥६॥

॥ जय सच्चिदानंद ॥

# खापर्डे यांची शिरडी दैनंदिनी

**– साईनंद**

मंगळवार, २३–१–१९१२

मी सकाळी काकड आरतीसाठी उठलो आणि सूर्योदयापूर्वीच प्रार्थना पण पूर्ण केली. आज साईबाबांनी आपला बिछाना सोडताना ते कुणाशी एकही शब्द बोलले नाहीत. परंतु आम्ही त्यांना ते जेव्हा नेहमीप्रमाणे बाहेर जात असताना पाहिले तेव्हा त्यांनी अगदी मिस्किलपूर्ण चेहरा दाखविला. मी उपासनी, बापूसाहेब जोग व भीष्म यांचे बरोबर परमामृताचे वाचन केले आणि साईंच्या दर्शनासाठी मशिदीत गेलो. तिथे ते गंभीर मुद्रा धारण करुन बसले होते. ते एक शब्दही बोलले नाहीत. माध्यान्ह आरती शांततेने पार पडली. त्यानंतर आम्ही परतलो व भोजन घेतले. आज माधवरावांनी माननीय श्रीमती रसेल बाईंना साईबाबांचे चित्र व उदी (इंग्लंडला) पाठविण्याची परवानगी मिळविली होती. माझा पण त्यांना एक पत्र लिहावे, असा विचार होता, वाटतही होते. पण मनच कुठे लागेना, म्हणून शेवटी राहिले. नुकतेच एक शाळामास्तर बाबांच्या संध्याकाळच्या रपेट दर्शनासाठी आपल्या परिवारासह आले होते. त्यांच्या बरोबर गप्पागोष्टी करीत बसलो. दिक्षितांनी रामायणाचे वाचन केले आणि मग आम्ही सर्वांनी साईंचे ते सायंकाळच्या रपेटीस जात असताना दर्शन घेतले. ते त्यावेळी पण फारसे बोलले नाहीत. रात्री भीष्मांनी या आठवड्यातले पहिले असे भजन म्हटले. गावातील काही युवक मंडळीपण भजनासाठी आली होती. त्यानंतर दिक्षितांचे पुन्हा रामायणाचे पाठ झाले. श्रीमती लक्ष्मीबाई कौजलगी येथे कायमचेच रहाण्यासाठी म्हणून आल्या होत्या. त्यावर साईबाबा म्हणाले की, तिने आपल्या भल्यासाठी म्हणून येथे राहावे, हे बरे.

# बाबा माझे कृपाळू

– सौ. श्रद्धा पंढरीनाथ केणी
२०/९७९, मच्छीमार कॉलनी,
माहिम, मुंबई - ४०० ०१६.

परमेश्वर कुणाला कोणत्या रूपात भेटेल, सांगता येत नाही. ११ नोव्हेंबर १९८७ रोजी आमचे लग्न झाले आणि माझ्या यजमानांच्या निरिसम साईभक्तीमुळे साईकृपेने पावन झालेल्या शिरडीला मी जाऊ शकले. देवही खऱ्या भक्ताची कसोटी बघतो. आणि अशा कसोटीतून कधीकाळी आपल्यालाही जावे लागेल, याची सुतराम् कल्पनाही मला नव्हती. घडले ते असे की, मुंबईहून आम्ही मोजक्या सामानानिशी म्हणजे माझी नेहमीची वापरातली पर्स व एक बॅग घेऊन शिर्डीच्या प्रवासाला निघालो. माझ्या पर्समध्ये एशियाड बसची तिकिटं व खर्चापुरते पैसे ठेवून बाकी सर्व पैसे, दोन कॅमेरे, कपडे मिळून जवळजवळ ४००० रु. चे सामान बॅगेत होते.

प्रवासात आम्ही कुठेच खाली उतरलो नाही. नाशिकला मात्र गाडी १० ते १५ मिनिटे थांबणार, ही खात्री करून एका हॉटेलात आम्ही खानपान उरकले. आम्ही जेव्हा हॉटेलात जाण्यासाठी निघालो, तेव्हा बस डेपोच्या आत होती, येऊन पाहतो तर काय, बस जागेवर नाही! आम्ही बाहेर व सामानाची बॅग बसमध्ये. आम्ही खूपच घाबरलो पण हे मला सारखे धीर देत होते. श्रध्दा असू दे. बॅग कुठेही जात नाही, सबूरी ठेव, हा सर्व साईचा खेळ आहे. कंट्रोल स्टेशनला चौकशी केली पण तिथेही बस ५ ते १० मिनिटांपूर्वी सिन्नरकडे निघाल्याचे कळले. आम्ही तावडतोब टॅक्सी पकडली. साईकृपेने ड्रायव्हरपण देवमाणूस मिळाला, त्याने आम्हाला जास्तीत जास्त वेगाने सिन्नरला आणले. परंतु तेथेही आमची बस आम्हाला पकडता आली नाही, तेथेही चौकशी केली असता, उध्दट , उडवाउडवीची उत्तरे मिळाली. शेवटी आम्ही शिर्डीला त्याच टॅक्सीने गेलो. आम्ही दोघेही मनातून साईचा धावा करीत होतो आणि त्यांच्याच कृपेने तब्बल २.३० ते ३ तासानंतर आमची बस आम्हाला शिर्डी डेपोला येताना दिसली. अगदी ज्या बॅगेची काळजी वाटत होती, त्या बॅगेसकट. बसमधल्या प्रवाशांनी नंतर आम्हाला सांगितले की, त्यांनी आम्हाला इकडून तिकडून धावपळ करताना पाहिले, कारण नंतर डेपोतून बस मुख्य रस्त्यावर आणून ठेवली होती, पण इतके असूनही एकानेही बसमधून आम्हाला हाक मारली नाही. शेवटी एकच खरे की, साईंनी आमची नवपरिणित जोडप्याची कसोटी पाहिली.

असेच बाबा आमच्या पाठीशी सदैव राहोत व त्यांच्यावरील आमची निष्ठा सदैव वाढत राहो, हीच साई प्रभूचरणी प्रार्थना।

# श्रीसाई स्मरण-चिंतनातून चिदाकाशाकडे!

– श्री. चकोर रा. आजगांवकर एम.ए.
(उप सचिव, शिक्षण खाते, महाराष्ट्र शासन)
वाय् ११/१७०, सरकारी वसाहत
वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१

**प्राणमनाचा मी अद्भुत लय**
**अनाहताचा ध्वनि नादमय**
**मी तेजोमय ज्योति चिन्मय**
**धरुनि शक्तिकर हाती माझा कर शून्यात प्रवेश!**
**(श्रीसाईगीतायन)**

सर्व साधनांचे मर्म स्मरण व चिंतन या मनाच्या प्रक्रियांना बाबांकडे लावणे हे होय, हे तत्त्व मी मे महिन्याच्या अंकात मांडले होते. मनाला प्रिय वस्तूकडे (स्त्री, पैसा, सत्ता, मान इ.) धाव घ्यावयाची सहज प्रेरणा असते. याचे कारण बालपणापासून व प्रौढपणातही या गोष्टीची व्यावहारिक व इंद्रियसुखाच्या दृष्टीने महत्ता पटलेली असते. **सारा जमानाच जिथे अर्थ, मान, सत्ता व शरीरसुख या भोवती भ्रमत आहे, तिथे परमेश्वराचे प्रेम कोण, कुणाला, कसे आणि कधी शिकविणार?** शिवाय जगावेगळे निरपेक्ष श्रद्धा व प्रेम शिकण्यास तयार तरी कोण होणार?

हे जरी सत्य असले, तरी पूर्वपुण्याईने मानवाला देवाकडे केव्हा तरी वळावे लागते. मग त्याचे कारण दुःख, संकट असते. अथवा एखाद्या चमत्काराने, व्यवहाराने न मिळणारी गोष्ट मिळेल,अशी आशा निर्माण झाल्यामुळे तरी तो देवाकडे वळतो. **अशी अर्थार्थी माणसे असंख्य असली तरी त्यांतून एकाद दुसरा प्रामाणिक साधकही निर्माण होऊ शकतो.** स्वार्थ केंद्राकडून तळमळीने प्रभुकडे वळलेला तो भक्त खऱ्या अर्थाने भक्तिमार्गाने साधना करावयास पात्र ठरतो. प्रभूची सत्ता, शक्ति व प्रेम याची जाणीव झाल्यावर त्याला संसारातील त्या आकर्षणात पूर्ववत् रमावेसे वाटत नाही. त्याची जीवनसरिता वेगळा मार्ग शोधू लागते.

अशा भक्ताच्या मनातील **चिंतानाची** प्रक्रिया साईचे रुप, साईंचे गुण, साईंची लीला, त्याचे गुणसंकीर्तन याकडे सतत वाहू लागते. साई याचा अर्थ केवळ साईबाबा एवढाच नसून विश्वाचे गुरुस्वरुप स्वामी, भगवंत असा आहे. **साई ही एक त्या प्रभुची जवळची व जिव्हाळ्याची प्रतिमा वा प्रतिबिंब होय. प्रभुचिंतन करणारा साधक पुढे अधिक प्रगत होतो व श्रीसाईप्रभूच्या नाम रुपाचे ध्यान करतो. ध्यानाचे रुपांतर ध्यासात होते. ध्यासाचे निदिध्यासात होते व मग खऱ्या भक्तिमार्गाची सुरुवात होते.** एवढी अवस्था येण्यापूर्वीच जे स्वतःला **भक्त** वा **भक्तिमार्गीय** मानतात, तें अत्यंत कच्चे, अप्रगल्भच आहेत, असे त्यांनी स्वतःच समजावून घ्यावयास हवे.

**प्रपंचात ठायीठायी विखुरलेले प्रेम श्रीसाईगुरुंच्या पायावर योजणारा; जेजे प्रिय वा अप्रिय आहे, त्या ठायी साई प्रतिमा पहाणारा; साईचा ध्यास मनामध्ये स्थिर करणारा;**

**मनाला जे जे प्रिय ते साईपदी समर्पिणारा तोच साईबाबांचा वा परमेश्वराचा खरा भक्त होय.** बाकी तुम्ही आम्ही भक्ति करणारे केवळ "छाया" भक्त होत.

ही प्रेममय अवस्था आल्यावर प्राण सतत मस्तकावर संकल्पाने धारण केलेल्या **गुरु पादुकाकडे** लावावयास हवे बेंबीखालील मूलाधार· स्वाधिष्टान चक्राच्या भागातील इच्छांची आवर्तने बंद पाडावयास हवीत. बेंबीजवळील **मणिपूर** चक्रात मानवाचा क्रियात्मक **अहंकार** आहे. तो सहजकुंभकाद्वारे आकुंचित करावा. हृदयाच्या जागी **आवाहत चक्र** आहे, तेथे 'मी' स्फुरंत असतो. हा मी व्यापक करावा. **ही मीपणाची अस्मिता विश्वाएवढी व्यापक करावी. कंठाकडील विशुद्धीचक्रावरील प्राणाचे उड्डाण मस्तकावरील पादुकाकडे करावे. त्यासाठी वेणी स्थानाजवळील संकल्प स्मृतीचे प्रयोगीमनाचे स्थान चुकवून प्राणासह जाणीव मध्यमेंदूतील बुद्धीकडे म्हणजे आत्म्याकडे न्यावी व स्थिर करावी.** प्राणांचे उड्डाण मात्र गुरु पादुकाच्यावर अभिषेक करण्यासाठी त्याच्या तरंगासह, वृत्तीसह उच्चपदी न्यावे. **त्या शिवस्थानी पादुकावर मन, प्राण, बुद्धी, अहंकाराचे जाळ सतत शिंपडीत रहावे– चालता, बोलता, कर्तव्य करता ही सूक्ष्म जाणीव ब्रह्मरंध्राकडे न्यावयाचा आदेश पाळणारा केवळ भक्त रहात नाही तर ज्ञानी व ध्यानयोगी बनतो व परमेश्वराशी सलोकता पावतो.** प्राणमनाच्या या प्रक्रिया चिदाकाशातील वर्णिल्या आहेत. हेच **चिदाकाश** पुढे **दहराकाश** व प्रगत **महदाकाश** बनते|

# साध्यापेक्षा साधनेला अधिक महत्त्व दिले पाहिजे

**– डॉ. श्रीपाद परुळेकर**
लोंढा - ५९१ ३०१.

मोक्ष प्राप्तीची जी साधने आहेत, त्या सर्व साधनांना प्राप्तीपेक्षा जास्त महत्त्व दिले पाहिजे. साधनेमध्ये जास्त तीव्रता असल्यास साधन जास्त सुलभ व वेगवान होते. आम्ही साधनेला जितके महत्त्व दिले पाहिजे, तितके देत नाही. त्यामुळे साधना शिथिल राहते आणि सफलता दूर जाते.

महर्षि पातंजलीनी विहीत केलेल्या साधनेला उच्च कोटीचे गणले गेले आहे.

**तत्र स्थितौयत्नो ऽभ्यासः।** (योगदर्शन १/१३)

त्या अभ्यास-वैराग्यात स्थितीसाठी प्रयत्न करणे, याचे नाव 'अभ्यास' आहे.

**सतु दीर्घकालनैरन्तर्यसत्कारासेवितोदृढभूमि** (योगदर्शन १/१४)

पण तो अभ्यास फार वेळ लागून निरतंर त्याचप्रमाणे निष्ठापूर्वक करण्याने निश्चित चांगला होतो.

भगवान श्रीकृष्ण गीतेमध्ये परम श्रध्देने साधन करणाऱ्या आपल्या भक्ताला सर्वोत्तम मानतात.

**मय्यावेश्य मनो ये मां**
**नित्ययुक्ता उपासते ।**
**श्रध्दया परयोपेतास्ते मे**
**युक्ततम मतः ॥** (गीता १२/२)

"मला मनात **एकाग्र** करुन निरंतर माझ्या भजन ध्यानामध्ये लागणारे भक्तजन अतिशय श्रेष्ठ आणि श्रध्देने युक्त होऊन माझ्या सगुणरुप परमेश्वराला भजतात,ते मला योगीयांत अति उत्तम योगी म्हणून मान्य आहेत." जिथे परम श्रध्दा असते तिथे साधन आपोआप घडते. म्हणून श्रृति - स्मृति - इतिहास - पुराण वगैरे शास्त्रांमध्ये परमात्म्याच्या प्राप्तीची, ज्यात अनेक साधने सांगितली आहेत आणि गीतेमध्ये ज्ञानयोग, भक्तियोग, कर्मयोग आणि ध्यानयोग म्हणजे ब्रह्मयज्ञ, संयमयज्ञ, द्रव्ययज्ञ, तपयज्ञ, योगयज्ञ, स्वाध्याययज्ञ वगैरे नावाने जे अनेक प्रकार साधने म्हणून सांगितले आहेत, त्या साधनांचा उचित आदर केला पाहिजे.

बरेच साधक सांगतात, आम्ही साधना करतो पण आम्हाला सफलता प्राप्त होत नाही. ते सांगतात ते खरे असते,पण त्यांना सफलता प्राप्त न होण्याचे कारण हेच आहे की, ते साधना निष्ठापूर्वक निष्काम भावांनी करीत नाहीत (अभ्यासात सुध्दा हेच करतात पण तिथे 'कॉपी'ची सोय असते, इथे नाही). साधनात कळकळ असत नाही, त्यामुळे निराशा पदरी येते. म्हणून साधकाने अगत्य व श्रद्धापूर्वक आपल्या कर्तव्याचे पालन केले पाहिजे. फळाकडे पाहू नये. कारण मनुष्य कर्म करण्याचा अधिकारी आहे, फळाचा नाही.

**(कर्मण्येवाधिकारस्थे मा फलेषु कदाचन्)**

अशा प्रकारे जो साधक निष्काम भावपूर्वक साधना करतो, साधने पासून कसली अपेक्षा न ठेवता, आपले कर्तव्य समजून काम करतो आणि साधनाची अपेक्षा न करता साधना करतो, त्याची साधना फार शीघ्र आणि उत्तरोत्तर तीव्र होऊ लागते आणि शेवटी ती इच्छित फलप्राप्ती मिळवून देते, यात संशय नाही.

श्रद्धायुक्त भावनेने, निष्काम अपेक्षेने, अत्यंत एकाग्रतेने केलेली साधना फलप्राप्ती देऊन जाते.

संत देखिले अनेक । परी दळणारा हाचि एक

# श्री साईबाबांचे अतर्क्य दळण

– श्री. रमेश डी. चव्हाण
साईनिकेतन, गुजरलेन कॉर्नर, नवापूर,
मु. पो. ता. नवापूर, जिल्हा - धुळे,
नवापूर - ४२५ ४१८.

"एके दिवशी सकाळी जाण । बाबा करोनि दंतधावन
सारोनि मुखप्रक्षाळण । मांडू दळण आरंभिले"

श्री साईसच्चरित ग्रंथाच्या पहिल्या अध्यायातील ११० क्रमांकाची ओवी वाचत असतानाच दळण दळणाऱ्या साईबाबांविषयी व त्यांच्या दळणाविषयी कमालीची उत्सुकता वाटली. त्या उत्सुकतेपोटी पुढील भाग भराभर वाचून काढला. शिरडीच्या दारातूनच नव्हे, वेशीवरूनच पटकीसारख्या महामारीला काळं करावयास दळणाचा तोडगा म्हणजे केवळ अतर्क्य गोष्ट होय. बाबांना अनेक सिध्दी अनुकूल होत्या. त्यांच्या बळावर ते वाटेल ते करु शकत.

श्री साईसच्चरित ग्रंथाचे कर्ते हेमाडपंत एके दिवशी सकाळच्या वेळी बाबांच्या दर्शनासाठी म्हणून मशिदीत गेले, तेव्हाचा चमत्कार काय वर्णावा! ते लिहितात की, श्री बाबा मुखप्रक्षाळण करुन दळण दळावयास बसलेत. पोत्यातून सुपात गहू काढलेत. त्याआधी जमिनीवर एक गोणपाट टाकून त्यावर जाते ठेवले आणि खुंटा घट्ट केला. तो खुंटा हातात घेऊन खाली मान घालून भराभर गहू दळू लागलेत. याचे वर्णन करताना हेमाडपंत पुढे आपल्या रसाळ शब्दात लिहितात –

"हाती घेतले एक सूप । गेले गव्हाचे पोत्या समीप
भरभरुनि मापावर माप । गहू सुपात काढिले ॥१११॥
**दुसरा रिकामा गोण पसरिला । वरी जात्याचा ठाव घातला
खुंटा ठोकूनि घट्ट केला । व्हावा न ढिला दळतांना ॥११२॥**
मग अस्तन्या सारुनि वरी । कफनीचा घोळ आवरी
बैसका देऊन जात्याच्या शेजारी । पसरुनि पाय बैसले ॥११३॥
महदाश्चर्य माझिये मना । दळणाची ही काय कल्पना
अपरिग्रहा अकिंचना । ही कां विवंचना असावी ॥११४॥
असो खुंटा धरुनि हाती । मान घालोनिया खालती
बाबा निजहस्ते जाते ओढती । वैरा रिचविती अनेक ॥११५॥"

श्री साईबाबा हे दळण दळताना पाहून जमलेल्या लोकांना आश्चर्य वाटले, तेव्हा हेमाडपंत म्हणतात –

"संत देखिले अनेक । परी दळणारा हाचि एक
गहू पिसण्याचे ते काय सुख । त्याचे कौतुक तो जाणे ॥११६॥"

श्री बाबा स्वतः दळताहेत, ही वार्ता सबंध शिरडी गावात वाऱ्यासारखी पसरली व ते अप्रुप बघण्यासाठी पुष्कळ गर्दी झाली. पण बाबा का दळताहेत, हे विचारण्याचे कोणासही धाडस होत नव्हते.

"लोक पाहती साश्चर्य चित्ता । धीर न पुसाया हे काय करिता
गावात पसरता हे वार्ता । पातल्या तत्त्वता नरनारी ॥११७॥
धांवता धांवता बाया थकल्या । चौघी लगबग मशिदी चढल्या
जाऊनि बाबांचे हाता झोंबल्या । खुंटा घेतला हिसकोनी ॥११८ ॥"

पाहणाऱ्यांपैकी चार बायांनी मात्र हिंमत करुन बाबांच्या हातातील खुंटा बळजबरीने हिसकावून, त्यांनी दळण्यास सुरुवात केली तेव्हा बाबा त्यांचेशी भांडू लागले. पण त्यांचा तो उसना राग होता. त्यांच्या प्रेमापोटी लागलीच रागाचे रुपांतर अनुरागात झाले व ते गाल्यातल्या गालात हसू लागले.

"बाबा त्यासंवे भांडती । त्या एकसरा दळू लागती
दळता बाबांच्या लीला वानिती । गीते गाती बाबांची ॥११९॥
पाहुनि बायांचे प्रेमाला । उसना राग ठायीच निवाला
रागाचा तो अनुराग झाला । हसू लागले गालात ॥१२०॥"

जवळजवळ एका पायलीचे दळण दळून झाले व सूप रिकामे झाले तेव्हां दळणाऱ्या बायकांच्या मनात आले की, बाबांना ना घर, ना दार, ना संसार शिवाय त्यांची भिक्षावृत्ती असताना त्यांना ह्या पिठाचा काय उपयोग! तेव्हा आपणच चार भाग करून ते वाटून घ्यावेत. वाटा पाडण्याच्या तयारीत असतानाच इतका वेळ शांत असलेले बाबा क्रोधीत झाले व म्हणाले–

"चळल्या काय कुठे नेता । बापाचा माल घेऊन जाता
जा शिवेवरी नेऊन आता । पीठ तत्त्वता टाका ते ॥१२९॥
आल्या रांडा फुकट खाऊ । लुटाया मज धांवूधांवू
गहू माझे काय कर्जाऊ । पीठ नेऊ पाहता ॥१३०॥"

बाबांनी बापाचा माल लागला काय? फुकटखाऊ रांडा तुम्ही, मला लुटू बघता काय? मी तुमचे गहू कर्जाऊ आणले होते काय? म्हणून पीठ घेऊन जाता! आत्ताच्या आत्ता जा व हे पीठ शिवेवर पसरुन या. आपली फजिती झाल्यामुळे त्या मनात खूप हिरमुसल्या परंतु बाबांचा हुकूम अमान्य करणे त्यांना शक्य नव्हते म्हणून तत्काळ शिवेवर गेल्या.

तेव्हा लोकात कुजबूज सुरु झाली की, गावात महामारीची म्हणजे पटकीची साथ असून त्या साथीवर उपाय म्हणून श्री बाबांनी गहूच नव्हेत तर महामारी भरडून काढली व महामारीस पळवून शांतता प्रस्थापित केली तेव्हा हेमाडपंताच्या मनात विचार आले –

"काय असावा हा अनुबंध । गव्हा-रोगाचा काय संबंध
पाहुनि अतर्क्य कारण निर्बंध । वाटले प्रबंध लिहावा ॥१३८॥"

गव्हाच्या पीठाचा व रोगाचा ताळा म्हणजे केवळ अतर्क्य होय. परंतु बाबांच्या

दळणाचा लाक्षणिक व पारमार्थिक अर्थ लावला जातो, तो असा –

बाबांनी दळणाच्या माध्यमातून गहूच नव्हे तर आपल्या असंख्य भक्तांची पापे, शारीरिक व मानसिक आधीव्याधी व येणारी संकटेच भरडून काढली आहेत. त्यांच्या जात्याची दोन पेंडे म्हणजे कर्म आणि भक्ती होत. कर्म हे खालचे पेंड तर भक्ती हे वरचे पेंड होय आणि जात्याचा खुंटा म्हणजे ज्ञान होय.

आपल्यातील सर्व प्रवृत्ती, वासना, पापे, सत्त्व, रज आणि अहंकार ह्यांना भरडून काढल्याशिवाय आत्मज्ञान व आत्मसाक्षात्कार होणे शक्य नाही. ही गोष्ट भक्तांनी प्रामुख्याने लक्षात घ्यावी म्हणून बाबा हयात असेपर्यंत दळणाचे कार्य चालू होते. भक्तांनी बाबांच्या दळणापासून बोध घेऊन त्याप्रमाणे वागावे म्हणजे बाबा आपल्या पाठीशी राहतील.

पाठीशी राहतील यावरुन याप्रसंगी माझी 'साई पाठी उभा' ही कविता आठवते ती अशी –

| | |
|---|---|
| जीवनात माझ्या | वेदनेच्या काठी |
| साईपाठी उभा .. | गाऊ साईधून... |
| संकटाच्या नभा... | येईल धावून... |
| काय भ्यावे? | साईबाबा! |
| दुःखाचा सागर | आयुष्यात मग |
| सभोवार जरी... | सुखाची भरती... |
| काय भीति तरी... | यशस्वी ठरती ... |
| बाळगावी! | सदोदित!" |

भक्तांच्या कल्याणासाठी दळण दळणाऱ्या ह्या थोर विभूतीस माझे शतशः प्रणाम!

# परोपकारी साईबाबा

– **श्री. दत्ताराम पुंजाजी घुगे**
विशेष कार्यकारी दंडाधिकारी,
१/३७, रमेशचंद्र चिमणलाल चाळ,
ताडदेव, मुंबई - ४०० ०३४.

साईबाबांचे आपल्या भक्तांवर अनंत उपकार आहेत. त्याप्रमाणे बाबा नेहमी गोरगरीब, दलित, अन्यायाने पिडलेल्या पिडीत भक्तांच्या पाठीमागे पितृछत्र धरुन उभे रहात चुकलेल्याला मार्ग दाखवित, गुन्हेगाराला शासन करीत, तर व्यसनाधिशांना व्यसनमुक्त करीत. लक्ष्मी नावाच्या चुणचुणीत मुलीचे वडील व्यसनी,

दारुबाज होते. त्यांनी दारुसाठी घरादाराची राखरांगोळी केली होती. पैशासाठी तो घरात दररोज भांडत असे. तिच्या आईला मारझोड करीन असे. या त्रासाने लक्ष्मी खूपच निराश झाली होती. अखेर ती बाबांकडे रडत आली.

तो दिवस दिवाळीचा होता. शिर्डी नगरी सुशोभित दिव्यांनी फुलून गेली होती. प्रत्येक घरात आनंद होता. पण लक्ष्मी निराश आहे, हे बाबांनी पाहून तिला म्हटले, अग झिपरे, आजच्या सोन्यासारख्या दिवशी निराश का? तिने बाबांसमोर दु:खाश्रू वहात आपल्या व्यसनी पित्याची गोष्ट कानी घातली. बाबांनी तिच्या डोक्यावरुन आपल्या कृतार्थ हाताच्या मायेचा स्पर्श फिरविला आणि तिला धीर दिला. रडू नकोस बाळ तुझ्या वडिलांची कायमची दारु सोडवून त्यांना चांगले करतो.

साईबाबांनी लक्ष्मीच्या वडिलांना आपल्या तेजस्वी नजरेने सांगितले, तू दारुसारख्या आयुष्यातून उठविणाऱ्या विषाला का हात लावतोस? आज तू आपल्या मेहनतीचा मोबदला सगळा दारुत खर्च करतोस. पण तू तुझ्या बायकोचा, मुलीचा विचार करतोस की नाही? त्यांचं पुढील भवितव्य काय? तुझ्या बरोबर त्यांचे तू वाटोळे का करतोस? हे बाबांचे बोल ऐकताच त्याची नशा उतरली. तो शुध्दीत येऊन बाबांच्या पायावर कोसळला. 'बाबा मी चुकलो. मला क्षमा करा. आयुष्यात मी या दारुला कधीच स्पर्श करणार नाही. मी माझ्या पत्नीला आणि मुलीला दुखवणार नाही. त्यांना सुखात ठेवीन. मी तुमच्या चरणाची शपथ घेतो', असे म्हणून त्याने कायमची दारु सोडली. मोलमजूरी करुन त्याने पूर्वीसारखा आपला संसार थाटला आणि ते सर्व आनंदाने बाबांचे एकनिष्ठ भक्त झाले.

बाबांनी कित्येक धुळीला जाणारे संसार उभे केले. त्यांना जीवनात जगण्याचे महत्त्व पटवून दिले.

एका नर्तकीने बाबांना फसविण्याचा बेत फौजदारी अधिकाऱ्यानुसार केला. नर्तकीने बाबांना मोहपाशात घेण्याचा प्रयत्न केला परंतु बाबांनी तिचा डाव ओळखला. ती नाचता नाचता तिच्या पायातले घुंगरु निखळून पडले. बाबांनी तिला हाकलून देण्याचा आदेश दिला. अखेर तिने बाबांचे पाय धरले. आपल्या गुन्ह्याची कबुली दिली. बाबांनी तिला माफ केले. आपल्या द्वारकामाईत ठेवून तिच्या अमोल कलेला प्रोत्साहन दिले.

# श्री साई सहस्र नामावली

संकलन – श्री. संजीव गजानन चंदने
माणिक कॉलनी, अहिल्यादेवी चौक,
कल्याण-४२१३०१.

॥ श्री गणेशाय नमः ॥

श्री साई छंद नमो नमः ।
श्री साई देवता नमो नमः ।
श्री साई बीज नमो नमः ।
श्री साई करन्यास नमो नमः ।
श्री साई अंगन्यास नमो नमः ।
श्री साई मालामंत्र नमो नमः ।
श्री साई शक्ति नमो नमः ।
श्री साई किलक नमो नमः ।

१) श्री साई गणेशाय नमः।
२) श्री साई सरस्वती नमो नमः
३) श्री साई सद्‌गुरुनाथाय नमः
४) श्री साई शिरडी निवासी नमो नमः।
५) श्री साई सच्चीद्रानंदाय नमो नमः।
६) श्री साई शंकराय नमो नमः
७) श्री साई साहीत्य देवाय नमः
८) श्री साई सुविचार नमो नमः
९) श्री साई सन्मार्ग देवाय नमः
१०) श्री साई सत्‌संग देवाय नमः
११) श्री साई सर्वधर्म देवाय नमः
१२) श्री साई नाथाय नमो नमः
१३) श्री साई सबुरी देवाय नमः
१४) श्री साई सत्कर्णी देवाय नमः
१५) श्री साई श्रद्धा नमो नमः
१६) श्री साई संदेश नमो नमः
१७) श्री साई शिरडीश्वराय नमो नमः
१८) श्री साई शिव नमो नमः
१९) श्री साई पंथवृत्ती नमो नमः।
२०) श्री साई सत्वगुण नमो नमः
२१) श्री साई सिताराम देवाय नमो नमः
२२) श्री साई संमेलन नमो नमः
२३) श्री साई संस्कार नमो नमः
२४) श्री. साई सौजन्य नमो नमः
२५) श्री साई सुवचन नमो नमः
२६) श्री साई स्वच्छंद नमो नमः
२७) श्री साई सगुण रुप देवाय नमः
२८) श्री साई महर्षी नमो नमः।
२९) श्री साई सुखरुप देवाय नमो नमः
३०) श्री साई शिवानंद नमो नमः
३१) श्री साई शक्ती नमो नमः
३२) श्री साई सद्‌बुद्धी दाता नमो नमः
३३) श्री साई शामसुंदर देवाय नमः
३४) श्री साई सबका मालिक एक नमो नमः
३५) श्री साई सूर्य प्रभा नमो नमः
३६) श्री साई सुखकर्ता नमो नमः
३७) श्री साई सदैव साथी नमो नमः
३८) श्री साई सुगंध नमो नमः
३९) श्री साई सूर्यकला नमो नमः
४०) श्री साई सदानंदाय नमो नमः

....

४१) श्री साई संजीवन देवाय नमः
४२) श्री साई शरणानंदाय नमो नमः
४३) श्री साई सदाशिव देवाय नमः
४४) श्री साई सब संत देवाय नमः
४५) श्री साई संगत देवाय नमः
४६) श्री साई शशीकलाय नमो नमः
४७) श्री साई सर्वधर्माधिकारी नमो नमः
४८) श्री साई सर्वेश्वराय नमो नमः
४९) श्री साई सकल जन हिताय नमः
५०) श्री साई संचार नमो नमः
५१) श्री साई समाधी देवाय नमः
५२) श्री साईनाथ सोबती नमो नमः
५३) श्री साई कृपासागर नमो नमः
५४) श्री साई संकल्प नमो नमः
५५) श्री साई सकलनाथाय नमो नमः
५६) श्री साई सुमंगल देवाय नमः
५७) श्री साई स्नेह नमो नमः
५८) श्री साई प्रबोधन देवाय नमः
५९) श्री साई श्रद्धा-सबुरी नमो नमः
६०) श्री साई शांताराम नमो नमः
६१) श्री साइ सकट निवारा देवाय नमः
६२) श्री साई शब्द सामर्थ्य देवाय नमः
६३) श्री साई "शीला" देवाय नमः
६४) श्री साई स्पर्श देवाय नमः
६५) श्री साई शिवशंकर नमो नमः
६६) श्री साई सुख शांती नमो नमः
६७) श्री साई स्फूरण देवाय नमः
६८) श्री साई शिरडी तारा नमो नमः
६९) श्री साईश्वरनमो नमः
७०) श्री साई शिरडी क्षेत्र नमो नमः
७१) श्री साई संत कृपा नमो नमः
७२) श्री साई सद्भाव. नमो नमः
७३) श्री साई सेवा नमो नमः
७४) श्री साई सद्भक्ती नमो नमः
७५) श्री साई साधु संत देवाय नमः
७६) श्री साई सत्पुरुषाय नमो नमः
७७) श्री साई सिद्धयोगी नमो नमः
७८) श्री साई सिता पति नमो नमः
७९) श्री साई सोमनाथाय नमो नमः
८०) श्री साई शिवकृपाय नमो नमः
८१) श्री साई साक्षी गोपाळ नमो नमः
८२) श्री साई श्रद्धा प्रमर्थाय नमो नमः
८३) श्री साई सौभाग्य नमो नमः
८४) श्री साई सकल समृद्धी नमो नमः
८५) श्री साई सोज्वळ रुप नमो नम
८६) श्री साई स्वयंप्रकाश नमो नमः
८७) श्री साई समाधान नमो नमः
८८) श्री साई सहवास नमो नमः
८९) श्री साई सर्वज्ञ देवाय नमः
९०) श्री साई सहनिवास नमो नमः
९१) श्री साई स्वार्थ त्यागी नमो नम
९२) श्री साई शुश्रूषा नमो नमः
९३) श्री साई साकार रुप नमो नमः
९४) श्री साई संपादन नमो नमः
९५) श्री साई साधुता नमो नमः
९६) श्री साई संतोष नमा नमः
९७) श्री साई संभाषण नमो नमः
९८) श्री साई सुरक्षितता नमो नमः
९९) श्री साई साक्षात्कार नमो नमः
१००) श्री साई स्वार्थरहित नमो नमः
१०१) श्री साई स्वर्गसुख नमो नमः
१०२) श्री साई सत्वप्रधान नमो नमः
१०३) श्री साई सामर्थ्य नमो नमः
१०४) श्री साई सहाय्यक नमो नमः
१०५) श्री साई सबुरी समर्था नमः
१०६) श्री साई सुभाग्य नमो नमः
१०७) श्री साई स्वाध्याय नमो नमः
१०८) श्री साई सर्व देव नमो नमः
१०९) श्री साई शांती स्थान नमो नमः
११०) श्री साई सूत्रधार नमो नमः

१११) श्री साई सुखसागर नमो नमः
११२) श्री साई संत चूडामणी नमो नमः
११३) श्री साई सहकार नमो नमः
११४) श्री साई सद्‌गती नमो नमः
११५) श्री साई सेवामयी जीवन नमो नमः
११६) श्री साई स्तुती गीत नमो नमः
११७) श्री साइ स्मृती नमो नमः
११८) श्री साई संध्या नमो नमः
११९) श्री साइ साक्षात्कारी संत देवाय नमः
१२०) श्री साई संत महंत नमो नमः
१२१) श्री साई शिष्योत्तम नमो नमः
१२२) श्री साई क्षमाशास्त्र नमो नमः
१२३) श्री साई "सुखद वंदन" नमो नमः
१२४) श्री साई स्वानंद धाम नमो नमः
१२५) श्री साई सर्व साक्षी देवाय नमः
१२६) श्री साई सुरक्षा नमो नमः
१२७) श्री साई सदाचार नमो नमः
१२८) श्री साई सुज्ञ नमो नमः
१२९) श्री साई शुद्धी नमो नमः
१३०) श्री साई सर्व समान नमो नमः
१३१) श्री साई सर्व संरक्षण नमो नमः
१३२) श्री साई संपदा नमो नमः
१३३) श्री साई सचेतन नमो नमः
१३४) श्री साई स्मीतहास्य नमो नमः
१३५) श्री साई संतसमागम नमो नमः
१३६) श्री साई साधन नमो नमः
१३७) श्री साई सूक्ष्म तप नमो नमः
१३८) श्री साई सिद्धी नमो नमः
१३९) श्री साई संकलन नमो नमः
१४०) श्री साई स्फूर्ती नमो नमः
१४१) श्री साई शिवराम नमो नमः
१४२) श्री साई सर्वगुण नमो नमः
१४३) श्री साई सर्वांग सुंदर नमो नमः
१४४) श्री साई सत्य नारायण नमो नमः
१४५) श्री साई क्षमाशील नमो नमः
१४६) श्री साई शक्तीनंदन नमो नमः
१४७) श्री साई सृष्टी स्वरुप नमो नमः
१४८) श्री साई संकट रक्षी नमो नमः
१४९) श्री साई सूर्यनंदन नमो नमः
१५०) श्री साई शशीनाथाय नमः
१५१) श्री साई संत चरण नमो नमः
१५२) श्री साई स्वानुभव नमो नमः
१५३) श्री साई संत भांडार नमो नमः
१५४) श्री साई साक्षात ईश्वर नमो नमः
१५५) श्री साई साधु पुरुषाय नमो नमः
१५६) श्री साई सर्वपंथाय नमो नमः
१५७) श्री साई संतजन नमो नमः
१५८) श्री साई संतलाभ देवाय नमः
१५९) श्री साई सिद्धयोगी नमो नमः
१६०) श्री साई सुलभता नमो नमः
१६१) श्री साई सदाचार प्रपंच नमो नमः
१६२) श्री साई संत कतृत्व नमो नमः
१६३) श्री सांई श्रीधराय नमो नमः
१६४) श्री साई शीव चंदनाय नमो नमः
१६५) श्री साई स्वामी नमो नमः
१६६) श्री साई शुक्रवार नमो नमः
१६७) श्री साई सुमुर्त स्वरुप नामे नमः
१६८) श्री साई शशीकलाय नमो नमः
१६९) श्री साई स्पंदनाय नमो नमः
१७०) श्री साई स्मरण नमो नमः
१७१) श्री साई सत्मधर्म नमो नमः
१७२) श्री साई सच्चिदानंद कल्पनम् नमो नमः
१७३) श्री साई संजीवानंदाय नमः
१७४) श्री साई स्वामी गोपीनाथ नमो नमः
१७५) श्री साई समर्थ देवाय नमः
१७६) श्री साई शरीरवाणी देवाय नमः
१७७) श्री साई सर्वाभूती देवाय नमः
१७८) श्री साई सेवाधर्म नमो नमः
१७९) श्री साई श्रीरंग देवाय नमः
१८०) श्री साई सत्यसर्वत्र नमो नमः

१८१) श्री साई सोमेश्वर नमो नमः

१८२) श्री साई संसार नाटक नमो नमः

१८३) श्री साई स्वरुपाय नमो नमः

१८४) श्री साई सगुणब्रह्मानमो नमः

१८५) श्री साई सन्मती नमो नमः

१८६) श्री साई संतप्रसाद नमो नमः

१८७) श्री साई सदैव साथी नमो नमः

१८८) श्री साई सृष्टी माता नमो नमः

१८९) श्री साई सुखसदन नमो नमः

१९०) श्री साई सर्वसुखदाता नमो नम

१९१) श्री साई शक्तीलहरी नमो नमः

१९२) श्री साई सामान्य जन कैवारी नमो नमः

१९३) श्री साई सिंहासन नमो नमः

१९४) श्री साई संत श्रेष्ठ नमो नमः

१९५) श्री साई संदर्भा नमो नमः

१९६) श्री साई सुखकर मूर्ती नमो नमः

१९७) श्री साई दत्त देवाय नमो नमः

१९८) श्री साईदाता नमो नमः

१९९) श्री साई दत्त अवतार नमो नमः

२००) श्री साई दातृत्व नमो नमः

## ॥ चराचरी भरे साई ॥

सर्व चराचर पुरुनी
तीन अंगुले अुरे साई
चंद्र सूर्याच्या नेत्राने
पहाती चराचरा साई ॥१॥
उषःप्रभेच्या रवीकिरणांनी
उबदार मायेने स्पर्शीती साई
सर्व चराचरा सजीवा साई
रवी प्रभेच्या स्मित हास्याने
अन् रवीकिरणांच्या कराने स्पर्शिती साई ॥२॥
हसून वदती सजीव निर्जिवा साई
बाळांनो पहा एकदा मजकडे
मीही मग पाहेन तुम्हांकडे
टाका सान पाऊल एक पुढे
मी येईन दहा पाऊले पुढे
द्याया शुभाशीर्वाद तुम्हा पुढे

**— बी. व्ही. लांजेकर**
स्वारगेट, पुणे.

# इति श्री साई उवाच

(मागील अंकावरुन चालू)

- श्री. डी. जी. देशपांडे
१० - खूर सिलनाझ,
कोहिनूर रोड, दादर,
मुंबई - १४.

(८)

हो हो प्रकटेल विठ्ठल मूर्ति । भक्त भावार्थी पाहिजे ॥
डाकुरनाथाची डंकपुरी। अथवा विठ्ठल रायाची पंढरी ।
ती हीच रणछोड द्वारकानगरी । जाणें न दूरी पहावया ॥
विठ्ठल काय एकांतीचा उठून । येणार आहे दुसरा कुठून ।
भक्तप्रेमें उत्कटून । एथेंही प्रगटून राहील ॥
पुंडलिकें वडिलांची सेवा । करुन भुलविले देवाधिदेवा ।
पुंडलिकाच्या त्या भक्तिभावा । विटे विसांवा घेतला ॥

-अ. ४ था

(९)

विठ्ठल पाटील आला होता ना? भेट झालीना? तयाची ॥
मोठा पळपुट्या बरें तो विठ्ठल । मेख मारुनि करीं त्या अढळ ।
दृष्टी चुकवूनि काढील पळ । होतां पळ एक दुर्लक्ष ॥

(१०)

– अ. ४ था

तो होता दोस्त माझा । हा त्या माझ्या स्नेह्याचा सुत ।
म्हणून यांस मी आणिला खेंचित । नाहीं कधी हा नैवेद्य करीत ।
उपासी ठेवित मजलाही । विठ्ठलासही ठेवी उपाशी ।
म्हणून शिरडीस आणिलें यासी ।आतां देईन आठवणीसी ।
लावीन पूजेसी याजला ॥

श्री दासगणूचें पद

(११)

- अ. ४ था.

अगाध शक्ति अघटित लीला तव सद्गुरुराया ।
जडजीवातें भावें ताराया तूं नौका सदया ॥धृ.॥
वेणीमाधव आपण होउनि प्रयाग पद केलें ।
गंगा यमुना द्वय अंगुष्ठीं प्रवाह दाखविले ॥१॥
कमलोदभव कमलाकर शिवहर त्रिगुणात्मक मूर्ती ।
तूंची होउनी साईसमर्था विचरसी भूवरती ॥२॥
प्रहर दिसाला ब्रह्मयासमतें ज्ञान मुखें वदसी ।
तमोगुणाला धरुनि रुद्ररुप कधिं कधिं दाखविसी ॥३॥

कधीं कधीं श्रीकृष्णासम त्या बाललिला करिसी ।
भक्तमनासी सरस करुनी मराळ तूं बनसी ॥४॥
यवन म्हणावें तरी ठेविसी गंधावर प्रेमा ।
हिंदु म्हणूं तरी सदैव वससी मशिदींत सुखधामा ॥५॥
धनिक म्हणावें जरि तुला तरि भिक्षारण करिसी ।
फकिर म्हणावें तरी कुबेरा दानें लाजविसी ॥६॥
तवौकसातें मशिद म्हणूं तरि वन्ही ते ठाया ।
धुनिंत सदा प्रज्वळित राहे उदि लोकां द्याया ॥७॥
सकाळपासुनी भक्त साबडे पूजन तव करिती ।
माध्यान्हीला दिनकर येतां होत असे आरती ॥८॥
चहुंबाजूंना पार्षदगणसम भक्त उभे राहती ।
चौरी चामरें करीं धरुनी तुजवर ढाळीती ॥९॥
शिंग घड्याळें सूर सनय्या दणदणते घंटा ॥
चोपदार ललकारिती द्वारीं घालुनियां पट्टा ॥१०॥
आरतिसमयीं दिव्यासनिं तू कमलावर दिससी ।
प्रदोषकाळीं बसुनि धुनिपुढे मदन दहन होसी ॥११॥
अशा किल्ला त्या त्रयदेवांच्या प्रत्यहिं तव ठायीं ।
प्रचीतीस येतात आमुच्या हे बाबा साई ॥१२॥
ऐसें असता उगीच मन्मन भटकत हें फिरतें ।
अतां विनंती हीच तुला बा स्थीर करीं त्यातें ॥१३॥
अधमांधम मी महापातकी शरण तुझ्या पायीं ।
अलों निवारा दासगणूंचे त्रिताप गुरुराया ॥१४॥

(१२) — अ. ४ था

गुरुवार आणि शुक्रवारीं । सुर्यास्तीं साखूनियां वरी ।
उद जाळील जो क्षणभरी ।देईल श्रीहरी सुखतया ॥

(१३)

गरीबी अव्वल बादशाही । अमीरीसे लाख सवाई ।
गरीबोंका अल्लाभाई । अक्षयीं साई वदत कीं ॥

(१४) -अ. ५ वा

फकीर आहे महाक्रोधी । लागूं नका तयाचे नादीं ।
तो मज कधींच न विसंबे ॥
तुम्ही येथून करा पलायन । आतांच येईल गांवांतून।
करील तुमचे निसंतान । परम कठीण क्रोध त्याचा ॥
राग तयाचा मोठा कडक । येतांच होईल लालभडक ।
जा जा निघून जा कीं तडक । धरा कीं सडक शिरडीची ॥

— अ. ५वा

(१५)

माझिया भक्तांचे धामीं । अन्नवस्त्रास नाहीं कमी ।
मज भजती जे अनन्यपणें । सेविती नित्याभियुक्तमनें ।
तयांचा योगक्षेम चालविणें । ब्रीद हें जाणें मी माझे ॥

- अ. ६ वा

(१६)

एक पोर रे खांकेचें. म्हणती निसटले । भट्टीत पडलें एकाकी ।
ऐकूनि निजपतीच्या हाके । लोहाराची रांड धाके ।
मारुनि आपुल्या पोरास खांके । भाता फुंके भट्टीचा ॥
फुंकला फुंकता लक्ष चुकली । खांकेस पोवर हें तीं विसरली ।
पोर ती अचपळ तेथून निसटली । पडतांच उचलली मी शामा ॥
काढावयास तो पोरीला । गेलों तो हा प्रकार घडला ।
भाजूं दे रे हा हात मेला । प्राण रे वांचला पोरींचा ॥

- अ. ७ वा

(१७)

"आभाळ आलें आहे जाण । पडेल पाऊस पीक पिकोन ।
आभाळ वितळून जाईल ॥
भितां किमर्थ" ऐसे वदून । कफनी कंबरे पर्यंत उचलून ।
दाविते झाले सकळां लागून । ग्रंथी टवटवून उठलेल्या ॥
"पहा हे भोगणें पडे । तुमचें सांकडें मज लागीं" ॥

- अ. ७ वा

भजन

(१८)

पंढरपूरला जायाचें जायाचें ।
तिथेंच मजला राह्याचें ।
तिथेच मजला राह्याचें राह्याचें ।
घर तें माझ्या रायाचें ॥

- अ. ७ वा

(१९)

पोरी आंण गे चतुकर भाकरी ।

- अ. ८ वा

(२०)

फकीरी अव्वल बादशाही । फकीरीही चिरंतन राही ।
अमीरी क्षणभंगुर पाहीं । सदा बाबांहीं म्हणावें ॥

- अ. ८ वा

(२१)

काय करावें आई आज । गेलों मी वांद्यास जैसा रोज ।
नाहीं खावया प्यावया पेज । उपाशीं मज यावें लागलें ॥
मालक नाहीं मिळाला घरीं । आंतडीं माझीं कळकळली भारी ।
तसाच मी अन्नवीण माघारीं । भर दुपारीं परतलों ॥

– अ. ९ वा

(२२)

आई त्वां आज मज जेवूं घातलें । तेणें हें आकंठ पोट भरले ।
होते हे प्राण व्याकूळ झालें । ते तृप्त केले गे तुवां ॥
ऐसेंच करीत जावें नित्य । हेंच कामीं येईल सत्य ।
मशीदींत बैसून मी असत्य । बोलेन हे त्रिसत्य घडेना ॥
अशीच माझी दया जाणावी । भुकेल्या भाकर आधीं द्यावी ।
आपुल्या पोटा नंतर खावी । धरावें जीवीं हें नीट ॥

– अ. ९ वा

(२३)

सेवूनियां ती प्रेमाची भाकर । जाहलों मी तृप्त निर्भर ।
अजून मजला येती ढेकर । बाबा प्रत्युत्तर करितात ॥
तूं जेवूं बैसतां द्वारीं येतां । पोटीं क्षुधेची जया व्याकूळता ।
त्वा देखीलें ज्या श्वाना अवचिता । मजा एकात्मता तयासवें ॥
तैसें सर्वांगी माखिला चिखलासी । देखिलें त्वां जया सूकरासी ।
भुकेनें व्याकूळ झालेलियासी । माझी तयासीं एकात्मता ॥

– अ. ९

(२४)

कधीं मी श्वान कधीं सूकर । कधीं मी गाई कधीं मांजर ।
कधीं मुंगी माशी जलचर । ऐसीया विचरत रुपें मी ॥
पाही भूतमात्रीं जो मज । तोचि माझीया प्रीतीचा समज ।
तरी तूं भेदबुध्दीनें त्यज । ऐसीच भज मजलागी ॥

– अ. ९ वा

(२५)

"त्वां मजसाठीं काय आणलें"। बाबांनी त्यास पुसून पाहिले ।
"कांहीं नाहीं" म्हणता पुसिलें । स्मरण दिधलें लवमात्र ॥
तुला कोणी कांहीं वस्त । दिधली नाहीं का मज प्रीत्यर्थ"।
"नाही म्हणता साई समर्थ । प्रश्न स्पष्टार्थ पूसिती ॥
अरे घराहून निघतेवेळीं । नाहीं का दिधला तुझियाजवळी ।
खाउ आईने प्रेमसमेळी" । तेव्हां मग झाली आठवण ॥

– अ. ९ वा

२६

दासानुदास मी तुमचा ऋणी । निघालों दर्शनी तुमचिया ॥
ही एक तुमचीच कृपा मोठी । झाली मज तुमचे पायांची भेये ।
किडा मी तुमचे विष्ठेपोटी । धन्य मी सृष्टीं तेणेनी ॥

— अ. १० वा

(२७)

जाई दादाभटाच्या येथें । जा असे जा

— अ. ११ वा

(२८)

दादा तयाचा गुरु बामण । मी जातीचा मुसलमान ।
तरी मी तोच ऐसे मानून । केले गुरुपूजन तयाने ॥
आपण मोठे पवित्र ब्राह्मण । हा जातीचा अपवित्र यवन ।
कैसे करुं याचें पूजन । ऐसे न तन्मन शंकले ॥
ऐसें मज त्याने फसविले । तेथे माझे उपाय हरले ।
नको म्हणणे जागीच राहिलें । आधीन केले मज तेणे ॥

— अ. ११ वा

(२९)

मी कोणावरीही रागावतां । ठावें नचित्ता माझीया ।
माय हाणी लेंकरा लाता । समुद्र करी नदियां परता ।
तरीच मी होय तुम्हां अव्हेरिता । करीन अहिता तुमचिया ॥
मी माझीया भक्तांचा अंकिला । आहें पासींच उभा ठाकला ।
प्रेमाचा मी सदा भुकेला । हाक हाकेला देतसे ॥

— अ. ११ वा

(३०)

शाम्या तुझ्या ओठांचा ज्वर । अजून नाहीं वाळला तिळभर ।
नसतां अल्लाची खुदरत तयावर । मी काय करणार तयास ॥
नसतां अल्लामियाचा ऋणी । चढेल काय या मशीदीं कुणी ।
अघटित येथील फकीराची करणी । नाहीं मी धणी तयाचा ॥
असो बाखी पलीकडे थेट । आहे जी एक पाऊलवाट ।
चालून येसील काय तूं नीट । विचार जा स्पष्ट तयांते ॥
चाखेळांतीं चाळीस हजार । रुपयें तूं देणार काय मज ।
आज बोकड कापावयाचा मानस । आहे आमुचा मशीदीस ।
तुज काय घोस पाहिजे । किंवा पाहिजे तुवर अस्थी ।
किंवा वृषण वासना चिन्तीं । जा विचार त्या म्हाताऱ्याप्रती ॥
काय निश्चिती वांछी तो ।

तूं काय समजलास अंतरीं । करिसी फुशारी मज पुढें ॥
बुढ्ढेपणाचा तोरा दाविसी । ऐसेंच काय तूं कुराण पढसी ।
मक्का केल्याचा ताठा वाहसी । परी न जाणसी तूं माते ॥

- अ. ११ वा

(३१)

म्हणती 'हट का माघारा' । 'सबूर सबूर' वदत ते ॥

- अ. ११ वा

(३२)

परतणार केंव्हा निज सदनां । उंदयीक जानां म्हणाले ।

- अ. १२ वा

(३३)

जा बरें लवकर जा आतां । स्वस्थ चित्ता असावे ।
गेल्यासारखे चार दिवस । सुखी राहीं बेलापुरास ।
विचारुनियां सर्वत्रांस । माघारी शिर्डीस येई तूं ॥

धर्मासाठी मरावे । मरोनी अवघ्यांसी मारावे ।
मारता मारता घ्यावे । राज्य आपुले ॥

— संत रामदास —

*ज्या ज्या स्थळी हे मन जाय माझे*
*त्या त्या स्थळी निजरूप तुझे*
*मी ठेवितो मस्तक ज्या ठिकाणी*
*तेथे तुझे सद्गुरु पाय दोन्ही*

"शरण मज आला आणि वाया गेला
दाखवा दाखला ऐसा कोणी!"

— श्री साईबाबा —

# दार उघड साई

दार उघड साई दार उघड
पाठी लागले चोर असूर
धावू मी आता कुठ वरं?
दार उघड साई दार उघड—
काम क्रोध मातले फार
जीवासी नाही, नाही थार
जीणे हे झाले अवघड । झाले अवघड
दार उघड साई दार उघड ॥१॥
मन झाले सैरा वैरा
क्रोधाचा क्षणात चढतो पारा
सुटेना सवय ही द्वाड । सवय ही द्वाड
दार उघड साई दार उघड ॥२॥
साईविण सुचेना कांही
साईविण मनात कांहीच नाही
तरीही चालली धडपड । चालली धडपड
दार उघड साई दार उघड ॥३॥
किती सांगू मी साई तुला
जीव माझा थकत थकत चालला
थांबवी सारी वढ वड । सारी वढ वड
दार उघड साई दार उघड ॥४॥
सद्‌गुरु कृपे मज साई भेटला
जन्ममरण सारा फिटला
शांत झाली सारी गडबड । सारी गडबड
दार उघड साई दार उघड ॥५॥

**सौ. नीता जाधव**
६२९ सरेकर आळी,
मंहाड (रायगड).

# साई माझे आई

साई साई माझे आई
दर्शन दे मज लवकरी
तारी मज या अनाथ संसारी
करी कृपा या पामरावरी
सदा असू दे मुखी माझ्या
अमृतमय नाम साई साई
करुणासागर दयेचा बनूनी
पापाचे क्षालन करुनी
पदरात आता मज घेई
साई तुमीच अमुचे मायबाप
तुम्हाविना कुणी नसे दैवत
कुणा प्रार्थू तुम्हाविना साई
आले मी तुझिया शरणी
करिता तुमचे स्मरण साई
दुःखाचा समूळ नाश होई
देऊनी दर्शन मज लवकरी
कृतार्थ करी मज साई आई


-कु. सुरेखा धोंडू होबळे
हळदोणवाडी – मये,
डिचोली, गोवा.


# साई राजा

ह्या हृदयात माझ्या
बंदिस्त साई राजा
नाहीच सोडणार
ही खूण गाठ मार
सोडूं कसा तुला मी
संधी हातात नामी
जाशील कोठे आता
तूं सांग रे अनंता
गांजलो मी अपार
सोसले दुःख फार
आता कधी न सोडी
भक्तित तुझ्या गोडी
आता सदैव माझा
साई खराच राजा


– श्री. मुरलीधर घोलप
६५३ सहकार नगर - २,
शेल कॉलनी, चेंबूर, मुंबई - ७१.

# शिरडी वृत्त
# ऑक्टोबर ८७

या महिन्यात श्री साईबाबांचा पुण्यतिथी उत्सव आल्याने बाहेरगांवच्या साईभक्तांची गर्दी जास्त प्रमाणात होती.

**पुण्यतिथी उत्सव (दसरा) प्रारंभ दिन** – गुरुवार, दि. १. १०. ८७ रोजी पहाटे ५ वा. मंदिर उघडल्यावर ५.१५ वा. काकडआरती झाली. आरती संपल्यानंतर ६ वा. श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक समाधी मंदिरातून गुरुस्थानमार्गे द्वारकामाईत आली. त्या ठिकाणी श्री साईसत्चरित अध्याय वाचनास सुरूवात झाली. मागील उत्सव गुरुपौर्णिमा ८७ प्रमाणेच पारायणासाठी निवड पद्धती केली. विश्वस्तांसाठी पहिले ५ (पाच) अध्याय ठेवण्यात आले व राहिलेल्या ४८ अंध्यायांसाठी आदल्या दिवशी म्हणजे ३०. १०. ८७ रोजी दुपारी ३.०० ते ७.३० या वेळेत अध्यायवाचन करु इच्छिणाऱ्या भक्तांची नावे नोंदविण्यात आली व सोडत पद्धतीने भक्तांच्या समक्ष रात्री ८ ते ९ या वेळेत ४८ भाग्यवान साईभक्तांना निवडण्यात आले. त्यांची नावे मंदिर प्रमुख श्री. वि. वि. बागवे यांनी जाहीर केली. त्याप्रमाणे भक्तांना अध्यायवाचनाचे अनुक्रम नंबर देण्यात आले. सकाळी ६.३० वा. श्रींचे स्नान झाल्यानंतर नित्य कार्यक्रमा व्यतिरिक्त दुपारी ४.०० ते ६.०० पर्यंत ह.भ.प. आत्मारामबुवा बांदेकर, मुंबई यांचे सुश्राव्य कीर्तन झाले. सायंकाळी धुपारती झाल्यानंतर ७.३० ते ९.०० मंदिरासमोर स्टेजवर उपस्थित कलाकारांची हजेरी झाली. रात्रौ ९.१५ ते ११.१५ पर्यंत श्रींच्या पालखीची गावातून मिरवणूक निघाली. मिरवणूक वाद्यांच्या गजरात फिरुन आल्यानंतर शेजारती झाली.

**मुख्य दिवस, दसरा, शुक्रवार, दि. २. १०. ८७** – रोजी पहाटे ५ वा. मंदिर उघडल्यावर ५.१५ वा. काकड आरती सुरु झाली. ६ वा. श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक द्वारकामाईतून निघून गुरुस्थानमार्गे समाधि मंदिरात आली. नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त सकाळी ९ वाजता भिक्षा झोळी कार्यक्रम सुरु झाला. संस्थान विश्वस्तांसाठी १० व साईभक्तांसाठी २० झोळ्या ठेवण्यात आल्या होत्या. विश्वस्तांनी आपापसात ठरवून झोळ्या घेतल्या व भक्तांसाठी झोळी घेऊ इच्छिणाऱ्या भक्तांची आदल्या दिवशी नावे नोंदवून सोडत पद्धतीने वीस (२०) साईभक्तांना निवडण्यात आले होते. मंदिरप्रमुख श्री. वि. वि. बागवे यांनी त्यांची नावे नोंदवून त्यांना झोळ्या दिल्या. शिरडी गावात घरोघर भिक्षेसाठी गेल्यावर सुवासिनींनी श्रींच्या निशाणाची पूजा, आरती करुन भिक्षा झोळीत गहू, ज्वारी, बाजरी, तांदूळ, नारळ, फळे, पैसे अशी भिक्षा अर्पण करून प्रसाद घेतला. झोळी कार्यक्रम संपल्यानंतर धान्य, पैसे संस्थानमध्ये जमा करून झोळ्या मंदिर प्रमुख यांच्याकडे जमा करण्यात आल्या. सकाळी १०.३० त १२.३० ह.भ.प. आत्मारामबुवा बांदेकर, मुंबई यांचे साईबाबा पुण्यातिथी आख्यान कीर्तन झाले. त्यानंतर माध्यान्ह आरती झाली व तीर्थप्रसाद वाटण्यात आला

दुपारी १.०० ते ३.०० वाजेपर्यंत श्रींच्या आराधना विधीचा कार्यक्रम झाला. ब्राह्मणांना धोतर, उपरणे, सुवासिनींना खण व सेवेकऱ्यांना धोतरजोड, कापड देण्यात आले. सायंकाळी ५ वाजता सिमोल्लंघन मिरवणूक वाजतगाजत खंडोबाच्या देवळाजवळ गेली. त्या ठिकाणी श्रींच्या निशाणाची व शमीची पूजा झाल्यानंतर सोने लुटण्याचा कार्यक्रम झाला. त्यानंतर उपस्थित साईभक्तांनी खंडोबा देवाचे दर्शन घेतले व मिरवणूक परत येतेवेळी गावातील सर्व मंदिरात जाऊन देवतांचे दर्शन घेतले.

रात्रौ ९.१५ ते १२.०० पर्यंत श्रींच्या रथाची गावातून भव्य मिरवणूक निघाली होती. मिरवणुकीला श्रीकृष्ण बँडपथक, मुंबई अग्रभागी होते. सनई, चौघडा, डफ व राहता येथील बँडपथक बरोबर होते. साईभक्तांचे गायन, वादन, भजन इ. कार्यक्रम झाले. श्री. रघुनाथ बाबूराव सांडेभोर, सिने कलाकार, पुणे, यांचा भारूड कार्यक्रम झाला. ग्रामस्थांनी गारूड, भारूड कार्यक्रमात भाग घेतला. गारूड कार्यक्रमात सर्वश्री तुकाराम परदेशी, एकनाथ पाटील कोते, सुरेश भोसले, किसनराव हणमंता पा. गोंदकर यांनी भाग घेतला. रात्रभर कलाकारांच्या हजेऱ्या झाल्या. श्रींच्या दर्शनासाठी मंदिर रात्रभर उघडे होते.

**दसरा उत्सव, तृतीय दिन, शनिवार, दि. ३. १०. ८७**–सकाळी ६ वा. श्रींचे मंगल स्नान झाले. गुरुस्थान ठिकाणी ७.३० ते ८.३० रुद्राभिषेक झाला. नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त रात्रौ ७.३० ते १०.०० पर्यंत ह.भ.प. श्री. लक्ष्मण महाराज वाकचौरे, शिरडी यांचे एकादशी कीर्तन झाले. १० वा. शेजारती झाली.

**दसरा उत्सव, सांगता दिन, रविवार, दि. ४. १०. ८७**–पहाटे ५ वा. मंदिर उघडल्यावर ५.१५ वा. काकडआरती झाली. नित्यकार्यक्रमाव्यतिरिक्त सकाळी १०.३० ते १२.१५ ह.भ.प. आत्मारामबुवा बांदेकर, मुंबई यांचे कालाकीर्तन झाले. दहीहंडी कार्यक्रम झाल्यावर १२.३० वा. माध्यान्ह आरती झाली व तीर्थप्रसाद वाटण्यात आला. रात्री १० वा. शेजारती झाली व उत्सव समाप्त झाला.

**कोजागिरी पौर्णिमा** – मंगळवार दि. ६. १०. ८७ रोजी रात्रौ ८.०० ते १०.०० कलाकार हजेरी व १० ते १२ कीर्तन कार्यक्रम कै. डॉ. के. बी. गव्हाणकर कोजागिरी मंडळ, मुंबई यांनी केला. कीर्तन ह.भ.प. पद्मजाबाई सहस्त्रबुध्दे द्वारा गव्हाणकर मंडळ यांनी केले. रात्रौ १० ते १२ श्री साईबाबांची पूजा (मंत्रोच्चार) संस्थान पुरोहित यांनी केली व चंद्रपूजा कार्यक्रम मा. श्री. द. चि. पाठकसाहेब, प्रशासकीय अधिकारी यांचे हस्ते झाला. १२.१५ वा. शेजारती झाल्यानंतर मंदिर बंद झाले. उपस्थित भक्त मंडळींना दूध, पोहे प्रसाद वाटण्यात आला. मंदिर आवाराबाहेर शांती निवासाजवळ स्टेजवर रात्रौ १ ते सकाळी ६.०० वाजेपर्यंत कै. डॉ. के. बी. गव्हाणकर कोजागिरी मंडळातर्फे लोकनाट्य कार्यक्रम सादर केला. लोकनाट्य "कसा चोरुन बघतोय मेला" हे होते व सादरकर्ते शाहीर श्री. खामकर आणि मंडळ, घोडपदेव, मुंबई होते.

**लक्ष्मीपूजन कार्यक्रम**– गुरूवार, दि. २२.१०.८७ रोजी सायंकाळी ५ ते ६ पर्यंत

लक्ष्मीपूजन कार्यक्रम मा. कार्यकारी अधिकारी श्री. रा.द. बन्ने साहेब यांच्या हस्ते झाला. धुपारती झाल्यानंतर तीर्थप्रसाद वाटण्यात आला.

काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली, ती खालीलप्रमाणे–

**कीर्तनः–** १) ह.भ.प. मधुकर गणेश सूर्यवंशी, संस्थान पुजारी (गवई-कीर्तनकार-प्रवचनकार) यांची कीर्तने एकादशी व महत्वाच्या दिवशी झाली.

२) ह.भ.प. लक्ष्मण महाराज वाकचौरे, शिर्डी.

३) ह.भ.प. आत्माराम बुवा बांदेकर, मुबई.

४) ह.भ.प. सौ. पद्मजाबाई रघुनाथ सहस्त्रबुध्दे, घाटकोपर.

**प्रवचनः–** ह.भ.प. प्रोफेसर जनार्दन दवे, भावनगर (गुजरात).

**भजन, गायन, वादन इ.–** कलाकारांची नावे खालीलप्रमाणेः–,

१) श्री. रघुनाथ सांडभोर, पुणे २) श्री. प्रमोद रंगनाथ मेढी, शिरडी ३) सौ. कमल रघुनाथ सांडभोर, पुणे ४) कु. योगिता काशिनाथ रसाळ, शिरडी ५) श्री. भोलानाथ समेळ, मुंबई ६) श्री. दत्ताराम विठ्ठल घाग, मुंबई ७) श्री. बलभीम वसंतराव जोशी, शेरडी ८) श्री. पारस पोरवाल, शिरडी ९) श्रीमती नटेश्वरी गुप्ता, शिरडी १०) श्रीमती विजारामा स्वामी, बंगलोर ११) श्री. एथुराम स्वामी, बंगलोर १२) डॉ. नसीर शेख, रहाता १३) श्री. सत्वशील आठवले, रहाता १४) श्री. नामदेव नागू भोईर, नवघर १५) श्री. दौलतभाई शर्मा, मुंबई १६) श्री. नितीनकुमार कुडव्यास, सोलापूर १७) श्री. श्रीकृष्ण बँडपथक, मुंबई १८) श्री. दौलतभाई शर्मा, मुंबई १९) श्री. निखील सुधीर सावंत, मुंबई २०) श्री. हिमांशू अरूण बुलाल, शिरडी २१) श्री. प्रभुदास लक्ष्मण जाधव, शिरडी २२) श्री उल्हास अ. वाळूजकर, शिरडी २३) श्री. रावसाहेब देशमुख, उमरावती २४) श्री. नामदेव नागू भोईर, नवघर २५) श्री. शितलनाथ जाणवणेकर, पंढरपूर २६) श्री. भिमराज बनसोडे, साकुरी २७) श्री. भोलानाथ समेळ, मुंबई २८) श्री. नारायण क्षीरसागर, औरंगाबाद २९) श्री. विश्वास जोशी, राजगुरूनगर ३०) कुमार शेखर नटवर विसपुते, शिरडी ३१) श्री. विजय पवार, लक्ष्मीवाडी ३२) श्री. गणपत जाधव, शिरडी ३३) कु. चित्रा टोळे, शिरडी ३४) कु. वैशाली शांताराम मिराणे, शिरडी ३५) कु. लीना शांताराम मिराणे, शिरडी ३६) सौ. शरयु साईदास मराठे, शिरडी ३७) डॉ. नसीर शेख, रहाता ३८) सौ. रेखा मडावी, भिंगार ३९) सौ. उर्मिला जयस्वाल, कानपूर ४०) श्री. हरकचंद सनवाल, आलेगाव ४१) श्री. वसंत गोपीनाथ, काळोखे, शिरडी ४२) श्री. ज्ञानेश्वर वैद्य, शिरडी ४३) श्री. विष्णू दयाळ बाबा, उन्हाव ४४) श्री. जगन्नाथ गनाचार्य, मुंबई ४५) श्री. सी. व्ही. प्रसाद, हैदराबाद ४६) श्रीमती नटेश्वरी गुप्ता, हैदराबाद ४७) श्री. आर. प्रताप राजू, पाकाडा ४८) श्री. के. नागविरय्या गुप्ता, पाकाडा ४९) श्री. कृष्णा सिताराम ...कटकर, पाकाडा ५०) श्री. मधुसुदन सोपानराव आवटी, गणेशनगर ५१) सौ. कमल बाबुराव पुरोहित, शिरडी ५२) श्री. सदाशिव जाधव, ग्वाल्हेर ५३) श्री. अहमद गुलाब पठाण, शिरडी ५४) श्री. दत्तात्रय कर्डीले, वैजापूर ५५) श्री. बाळासाहेब

# घोषणा

श्री साईलीला मासिकाच्या मालकीबद्दल व अन्य तपशीलाबद्दल दरवर्षी फेब्रुवारी नंतरच्या पहिल्या अंकात प्रसिद्ध करावयाची घोषणा.

| | | |
|---|---|---|
| १. प्रकाशनाचे स्थळ | — | साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई–४०० ०,१४. |
| २. प्रकाशनाचा कालावधी | — | मासिक |
| ३. मुद्रकाचे नाव | — | श्री. एम. डी. राजन |
| राष्ट्रीयत्व | — | भारतीय |
| पत्ता | — | गीता ऑफसेट, बी–२३, रॉयल इंडस्ट्रियल इस्टेट, नायगांव, क्रॉस रोड, वडाळा, मुंबई–४०० ०,३१. |
| ४. प्रकाशकाचे नाव | — | श्री. रा. द. बन्ने |
| राष्ट्रीयत्व | — | भारतीय |
| पत्ता | — | साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई–४०० ०,१४. |
| ५. संपादकाचे नाव | — | श्री. रा. द. बन्ने |
| राष्ट्रीयत्व | — | भारतीय |
| ६. हे पत्र ज्यांच्या मालकीचे आहे त्यांचे व १ टक्क्याहून अधिक भांडवल धारण करणारे भागधारक किंवा भागदार यांची नावे व पत्ते | — | श्री साईबाबा संस्थान, शिरडी (धार्मिक व चॅरिटेबल संस्था) |

मी, श्री. रा. द. बन्ने यानुसार असे घोषित करतो की, वरील तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे सत्य आहे.

श्री. रा. द. बन्ने
(प्रकाशकाची सही)
कार्यकारी अधिकारी

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी
# श्री साईबाबा संस्थान प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. क्र. | पुस्तकाचे नांव | भाषा | किंमत | पॅकींग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्‌चरित | मराठी | ३१-०० | ९-०५ |
| २. | –,,– | इंग्रजी | १४-५० | ६-५० |
| ३. | –,,– | हिंदी | – | – |
| ४. | –,,– | गुजराथी | १९-०० | ६-५० |
| ५. | –,,– | कन्नड | १३-५० | ८-०० |
| ६. | –,,– | तेलगु | १८-०० | ८-०० |
| ७. | –,,– | तामीळ | – | – |
| ८. | –,,– | सिंधी | २२-०० | ७-५० |
| ९. | श्री साई सत्‌चरित पोथी | गुजराथी | ३१-०० | १०-५० |
| १०. | श्री साई लिलामृत | मराठी | – | – |
| ११. | –,,– | हिंदी | – | – |
| १२. | –,,– | गुजराथी | ६-६५ | ४-०० |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | – | – |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | ०-६५ | ३-५० |
| १५. | –,,– | हिंदी | १-०० | ३-५० |
| १६. | –,,– | गुजराथी | ०-९० | ३-५० |
| १७. | सगुणोपासना (आरती) | मराठी | ०-७० | ३-५० |
| १८. | –,,– | हिंदी | १-२५ | ३-५० |
| १९. | –,,– | गुजराथी | ०-८० | ३-५० |
| २०. | –,,– | तेलगु | २-५० | ५-५० |
| २१. | –,,– | सिंधी | १-२५ | ३-५० |
| २२. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | १-८५ | ३-५० |
| २३. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | ४-८० | ५-५० |
| २४. | मुलांचे साईबाबा | मराठी | – | – |
| २५. | –,,– | इंग्रजी | १-६५ | ३-५० |
| २६. | –,,– | हिंदी | – | – |
| २७. | –,,– | गुजराथी | १-६५ | ३-५० |
| २८. | –,,– | तेलगु | – | – |
| २९. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | ०-८० | ३-५० |
| ३०. | मार्गदर्शिका (शिर्डी गाईड) | मराठी | – | – |
| ३१. | –,,– | इंग्रजी | – | – |
| ३२. | –,,– | गुजराथी | १-५० | ३-५० |
| ३३. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ७-२५ | ४-०० |
| ३४. | साईबाबा ऑफ शिर्डी (भरुचा) | इंग्रजी | ६-५० | ४-०० |
| ३५. | साईबाबा ऑफ शिर्डी (प्रधान) | इंग्रजी | ३-०० | ४-०० |
| ३६. | अष्टोत्तर शत नामावली | मराठी | १-०० | ३-५० |
| ३७. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | १५-२५ | ४-५० |